दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादक:बाळासाहेब मस्के

बी.एम. प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब भगवानराव मस्के

बीड | शुक्रवार,दि.२३ मे २०२५ | वर्षे४थे | अंक२७८वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

# महाराष्ट्राच्या सुपुत्राला वीरमरण!
## दु:खद:जम्मू-काश्मिरात चकमक

पुण्यभूमी प्रतिनिधी

सिंगपोरा:जम्मू-काश्मीरच्या किश्तवाडमधील चतरू येथील सिंगपोरा भागात दहशतवादी आणि सुरक्षा दलांमध्ये चकमक झाली. या चकमकीत महाराष्ट्राचे सुपुत्र जवान संदीप पांडुरंग गायकर यांना वीरमरण आले. गायकर यांचे पार्थिव त्यांच्या मूळ गावी अहिल्यानगरातील अकोले येथील ब्राम्हणवाडा येथे उद्या आणण्यात येणार आहे. या घटनेनंतर संपूर्ण महाराष्ट्र शोकसागरात बुडाला आहे.

शहिद संदीप पांडुरंग गायकर गेल्या सहा ते सात वर्षांपासून सैन्यदलाच्या मराठा बटालियनमध्ये कार्यरत होते. मात्र, २१ मे रोजी जम्मू-काश्मीरमध्ये दहशतवाद्यांविरोधात लढताना त्यांना वीरमरण आले. त्यांच्या पश्चात आई-वडील, पत्नी आणि मुलगी आहे. त्यांच्या वीरमरणाची बातमी पोहोचताच गावात शोककळा पसरली. जम्मू काश्मीरमध्ये दहशतवाद्यांविरुद्ध ऑपरेशन दरम्यान जोरदार गोळीबार सुरू आहे. या चकमकीत एका जवानाला वीरमरण आले. ऑपरेशन अजूनही सुरू आहे असे पोस्ट व्हाईट नाईट कॉर्प्सने एक्स हँडलवरून केली. मिळालेल्या माहितीनुसार, जम्मू-काश्मीरच्या किश्तवाड येथील जंगलात दहशतवादी असल्याची माहिती भारतीय सैनिकांना मिळाली. यानंतर भारतीय सैनिकांनी संपूर्ण परिसराला वेढा घातला आहे. दहशतवाद्यांचा खात्मा करण्यासाठी मोहीम सुरूच आहे.



# शालार्थ आयडी घोटाळा

बोर्डाचे अध्यक्ष चिंतामण वंजारी 'एसआयटी'च्या जाळ्यात

रात्रीपर्यंत त्यांचा जबाब नोंदवणे सुरू होते

कारवाईमुळे शिक्षण विभागात खळबळ उडाली

२०१९ पासून हा गोरखधंदा सुरू असल्याचे समोर

पुण्यभूमी प्रतिनिधी

नागपूर :राज्याच्या शालेय शिक्षण विभागावर प्रश्नचिन्ह उपस्थित करणा-या शालार्थ आयडी घोटाळ्यात मोठी घडामोड झाली आहे. या प्रकरणात पोलिसांनी गुरुवारी राज्य शिक्षण मंडळाचे नागपूर विभागीय अध्यक्ष व तत्कालीन प्राथमिक शिक्षणाधिकारी चिंतामण वंजारी यांना ताब्यात घेण्यात आले. रात्रीपर्यंत त्यांचा जबाब नोंदवणे सुरू होते. या कारवाईमुळे शिक्षण विभागात खळबळ उडाली आहे.

बुधवारी(२१ मे) प्रत्यक्ष शालार्थ आयडी बनविणारा उपसंचालक कार्यालयातील लिपिकाची अटक व त्यानंतर लगेच वंजारी यांच्यावरील कारवाई, यामुळे या घोटाळ्यातील मुख्य सूत्रधारांपर्यंत एसआयटी लवकरच पोहोचेल असे अंदाज वर्तविण्यात येत आहे. नागपूर शिक्षण उपसंचालक कार्यालयात कार्यरत कनिष्ठ प्रशासन अधिकारी रवींद्र ज्ञानेश्वर पाटील यांनी १२ मार्च रोजी सायबर पोलिसांकडे यासंदर्भात तक्रार दाखल केली होती. शालार्थ आयडी गैरवापर प्रकरणात विभागीय शिक्षण उपसंचालक उल्हास नरड यांच्या अध्यक्षतेखाली सात सदस्यीय समिती नेमली होती.त्यानंतर, ऑगस्ट २०२४ मध्ये शासनाने डॉ. माधुरी सावरकरांच्या नेतृत्वात सात सदस्यीय समिती नेमली, मात्र मध्येच या समितीकडून होत असलेली चौकशी थांबविण्यात आली होती. त्यांच्या जागी विभागीय अध्यक्ष झालेले चिंतामण वंजारी यांना या चौकशीचा अधिकार सोपविण्यात आला होता. अगोदर नरडला अटक झाली व त्यानंतर एकापाठोपाठ एक लिंक समोर येत गेल्या. दोन दिवसांअगोदर पोलिसांनी प्रत्यक्ष बोगस शालार्थ आयडी बनविणा-या लक्ष्मण उपासराव मंघाम (४७, वासंती अपार्टमेंट, आकांशी ले-आउट, दाभा) याला ताब्यात घेतले. त्याच्या चौकशीतून वंजारी यांचे नाव समोर आले.







### आणखी एक अधिकारी रडारवर

दरम्यान, एसआयटीच्या रडारवर आणखी एक मोठ्या अधिका-याचे नाव आले आहे. या अधिका-यावर अगोदरपासूनच संशयाची सुई होती व लवकरच ताब्यात घेतले जाण्याची शक्यता आहे.

### वंजारींनीच दिली होती परवानगी

वंजारी यांचे नाव अगोदरच्या आरोपींच्या चौकशीतदेखील समोर आले होते. २०१९ पासून हा गोरखधंदा सुरू असल्याचे आतापर्यंतच्या तपासात स्पष्ट झाले आहे. वंजारी शिक्षणाधिकारी असतानाच बनावट शालार्थ आयडींना मंजुरी देण्यात आली होती. भरती प्रक्रिया बंद असतानादेखील ही मंजुरी देण्यात आली व या बाबी संगनमताने लपवून ठेवण्यात आल्या होत्या. सायबर पोलिस ठाण्याच्या पथकाने गुरुवारी वंजारी यांना ताब्यात घेतले. त्यांची सायंकाळी सखोल चौकशी झाली व त्यानंतर त्यांचे स्टेटमेंट घेतले जात होते.

# बीड शहरातील नागरी समस्या गंभीर
## डॉ.योगेश क्षीरसागर:राष्ट्रवादीचे सीओंना निवेदन



पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:शहरातील नागरी समस्या दिवसेंदिवस गंभीर होत असून, त्यावर तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार गट) शिष्टमंडळाने नगरपरिषद मुख्याधिकारी नीता अंधारे यांच्याकडे गुरुवारी (दि.२२) केली. पक्षाचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखालील या शिष्टमंडळात माजी नगरसेवकांचा समावेश होता. विविध विभागांतील समस्यांवर ठोस कृती आराखडा राबवावा, असेही निवेदनात म्हटले आहे.

निवेदनात पुढे म्हटले आहे की, शहरातील मान्सूनपूर्व स्वच्छता, नालेसफाई, पथदिवे, रस्त्यांची दुरवस्था, पाणी पुरवठ्याची विस्कळीत व्यवस्था, अपूर्ण गाळे व बाजारपेठांची कामे, तसेच आरोग्य सुविधा आणि कर वसुलीतील अडचणी आदी मुद्द्यांवर शिष्टमंडळाने मुख्याधिकाऱ्यांना धारेवर धरले. सध्या शहरातील अनेक मुख्य नाले कचऱ्यामुळे तुंबले असून, त्यामुळे डास, दुर्गंधी व आरोग्याच्या समस्या वाढल्या आहेत. हे नाले तातडीने यंत्राच्या सहाय्याने साफ करण्यात यावेत. तसेच, नव्या घंटागाड्या, जेसीबी व कम्पॅक्टर खरेदी करून स्वच्छतेसाठी पायाभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी करण्यात आली.

शहरातील अनेक भागांमध्ये पथदिवे बंद अवस्थेत आहेत तर काही भागांत दिवसा दिवे सुरू असतात. हायमास्ट दिव्यांचीही अवस्था दयनिय असून, त्यांची त्वरित दुरुस्ती आवश्यक आहे. सौर ऊर्जेचा वापर वाढवून मिनी हायमास्ट दिवे, स्मशानभूमीत प्रकाशयोजना व नगरपरिषद इमारतीवर सौर प्रकल्प बसविण्याचेही सुचविण्यात आले.पाणी पुरवठा विभागातील कंत्राटी कर्मचाऱ्यांचे वेतन वेळेवर व्हावे, माजलगाव व बिंदुसरा प्रकल्पाच्या मदतीने नव्या पाणी योजनांचा प्रस्ताव तयार करून शासनाला सादर करावा, अशा सूचना शिष्टमंडळाने केल्या. श्रीरामनगर येथील जुन्या पाण्याच्या टाकीऐवजी नवीन टाकी उभारण्याची, तसेच अनधिकृत नळजोडण्या नियमित करून कराच्या कक्षेत आणण्याची मागणी करण्यात आली.

बांधकाम विभागाच्या कामांबाबतही विविध सूचना देण्यात आल्या. यशवंत नाट्यगृह, आंबेडकर सांस्कृतिक भवन यांची दुरुस्ती करावी, प्रमुख चौकांचे सुशोभीकरण करावे, नव्या भाजी मंडई व गाळ्यांचे » पान २ वर

# शेत पिकाच्या नुकसानीचे पंचनामे करा
## अस्मानी:मंत्री मकरंद जाधव यांच्या सूचना



पुण्यभूमी प्रतिनिधी

मुंबई:राज्यात काही दिवसांपासून सुरू असलेल्या अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या शेत पिकांचे तातडीने पंचनामे करावेत, असे निर्देश मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी दिले.

मंत्री श्री. जाधव-पाटील म्हणाले, नैसर्गिक आपत्तींमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांप्रती राज्य शासन संवेदनशील आहे. एप्रिल व मे महिन्यात झालेल्या अवकाळी पावसाने शेत पिकांचे नुकसान झालेल्या » पान २ वर

# मानवतेला काळिमा फासणारे
## दु:खद:वैष्णवी हगवणे प्रकरणावर काय म्हणाले मुख्यमंत्री

पुण्यभूमी प्रतिनिधी

पुण्यातील वैष्णवी हगवणे प्रकरणी मी स्वत: पिंपरी-चिंचवडच्या पोलिस आयुक्तांना हस्तक्षेप करण्यास सांगितले आहे. वैष्णवी हगवणेचे बाळ आता तिच्या वडिलांकडे पोहोचलेले आहे. ही माणुसकीला काळिमा फासणारी घटना आहे. या प्रकरणाची योग्यरितीने चौकशी करण्यात येईल असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहे.

वैष्णवी हगवणे प्रकरण हे अतिशय दुर्दैवी असून मानवतेला काळिमा फासणारी घटना असल्याचे सांगताना » पान २ वर



### ज्योती मल्होत्रा प्रकरण

ज्योती मल्होत्राने मुंबईत कुठे कुठे येउन रेकी केली हे दिसून आले आहे. त्यात इतर कोण आहेत त्यांचाही शोध घेण्यात येत आहे. व्हाईट कॉलर बनून कसा देशद्रोह करण्यात येतो हे यातून दिसून आले आहे. देशद्रोहयांना कठोरात कठोर शिक्षा करण्यात येईल असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

# लातूरमध्ये लॉजवर नको ते धंदे
## कारवाई:तूळजापुरचे क्रिकेटपटू अन् पुजारीही सापडले




पुण्यभूमी प्रतिनिधी

लातूर: शहरातील शिवाजी रोड स्क्रॅप मार्केट जवळील आनंद लॉज मध्ये वेश्याव्यवसाय चालवला जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. लातूर पोलिसांच्या ए एच टी यु पथकाला याची माहिती मिळताच पोलिसांनी बनावट ग्राहक लॉजवर पाठवून आरोपींना ताब्यात घेतले आहे.

लातूर शहरातील शिवाजी रोड स्क्रॅप मार्केट जवळील आनंद लॉज मध्ये वेश्याव्यवसाय चालवला जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर » पान २ वर

प्रा.सचिन उबाळे | बैठकीत हजारो ठेवीदारांचा निर्धार

# आता ठेवीदार थेट मंत्रालयावर धडकणार

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:जिल्ह्यातील दिवाळखोरीत निघालेल्या बीडमधील मल्टिस्टेट, पतसंस्थांमध्ये अडकलेल्या ठेवी परत मिळण्यासंदर्भात शासन, प्रशासनाकडून आजपर्यंत कसलीच ठोस कारवाई करण्यात आली नाही. यामुळे आता थेट मुंबई येथील मंत्रालयावर धडकण्याचा निर्धार सर्वच ठेवीदारांनी केला. ठेवीदार कृती समितीचे राज्य समन्वयक तथा स्वाभिमान संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रा.सचिन उबाळे यांच्या नेतृत्वाखाली गुरुवारी (दि.२२) बीडमध्ये झालेल्या बैठकीत ठेवीदारांनी मंत्रालयावर धडकण्याचा निर्धार केला. यावेळी अ‍ॅड.विशाल कदम यांनी मल्टिस्टेट, पतसंस्थांविरोधात छत्रपती संभाजीनगर खंडपीठात याचिका दाखल करणार असल्याचे सांगितले.



जिल्ह्यातील ज्ञानराधा मल्टीस्टेट, साईराम मल्टीस्टेट, राजस्थानी मल्टीस्टेट (पतसंस्था), जिजाऊ मल्टीस्टेट, शुभ कल्याण मल्टीस्टेट, मातोश्री अर्बन, लक्ष्मीमाता अर्बन, मराठवाडा अर्बन (माजलगाव)आर्थिक » पान २ वर

### तपासाची गती थंडावली?

दिवाळखोरीत निघालेल्या मल्टिस्टेट, पतसंस्थाप्रकरणी एमपीआयडी प्रस्ताव मंजूर झाला परंतू अंमलबजावणी नाही. सीआयडीकडे तपास गेला मात्र कारवाई थंड आहे. अवसायकाची नेमणूक करण्यात आली मात्र कारवाई काहीच नाही. ईडीने ज्ञानराधाची प्रॉपर्टी जप्त केली मग ठेवीदारांच्या ठेवी कधी मिळणार ? असा प्रश्न उपस्थित करत बुडीत निघालेल्या सर्वच पतसंस्थामध्ये ज्ञानराधा प्रकरणी शासनाने वेगवेगळ्या कारवाया केल्या मात्र तपासाची गती थंडावली असल्याचा आरोप प्रा.सचिन उबाळे यांनी बैठकीत केला.

# कडा परिसराला पावसाचा तडाखा
## शेतकरी हताश:खांब पडले, वीज गायब,कांदा भिजला



पुण्यभूमी प्रतिनिधी

कडा:परिसरात सलग तिसऱ्या दिवशीही वादळी वाऱ्यासह जोरदार अवकाळी पावसाने तडाखा दिल्याने शेतात विजेचे खांब पडल्याने, काही ठिकाणी वीज गायब झाली. तर शेतात काढून ठेवलेला कांदा भिजल्याने शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसला आहे.

यंदा मे महिन्याच्या मध्यातच विज्यांच्या कडकडाटासह वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने हजेरी जनजीवन विस्कळीत झाले असून, कांदा उत्पादक शेतकऱ्यांची अक्षरशः तेधातिरपीट उडाली. आष्टीसह कडा, धामणगाव, धानोरा, निमगाव चोभा, अंभोरा या परिसरात मागील » पान २ वर

## अवकाळीचा तडाखा

गत काही दिवसांपासून राज्यात अवकाळी पावसाने धुमाकूळ घातला आहे. हवामान विभागाने सातारा, कोल्हापूर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, संभाजीनगर, सोलापूर, बीड या जिल्ह्यांना पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. तर मुंबई, पालघर, ठाणे, रायगड, नंदुरबार, धुळे, जळगाव, नाशिक, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, बुलडाणा आणि विदर्भातील जिल्ह्यांना यलो अलर्ट दिला आहे. हवामान विभागाने पुढील चार दिवस राज्यात पावसाची अशीच स्थिती राहील असा अंदाज व्यक्त केला आहे. गत तीन-चार दिवसांपासून महाराष्ट्रात पावसाने थैमान घातले आहे.पुणे, मुंबई, नाशिक, मराठवाडा, कोकण आणि विदर्भात धो-धो पाऊस पडतो आहे. मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटात पावसाचे बरसणे सुरू आहे. कर्नाटक किनारपट्टीजवळ चक्रीवादळ तयार होण्याची शक्यता असल्याने महाराष्ट्रात पावसाचा जोर आणखी वाढण्याची शक्यता आहे. गत दोन आठवड्यांपासून राज्यात मान्सूनपूर्व मध्यम सरी आणि मेघगर्जनेसह पाऊस पडत आहे. पुढील पाच ते सहा दिवसांत केरळमध्ये मान्सून धडकण्याची शक्यता आहे. तर १० जूनला मान्सून महाराष्ट्र व्यापणार आहे. जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात मान्सून तळकोकणात धडकण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. अवकाळी पावसाचा सर्वांत मोठा फटका शेतक-यांना बसला. उभ्या पिकांवर परिणाम झाला असून भात रोपवाटिका, कांदा, भाजीपाला, आंबा आदींचे मोठे नुकसान झाले आहे.

हवामानातील अस्थिरतेमुळे अनेक ठिकाणी दुर्घटना आणि विजांच्या कडकडाटामुळे जीवितहानी होण्याच्या घटना घडल्या. एकीकडे अवकाळी पावसामुळे नुकसान तर दुसरीकडे वेळेआधी मान्सून येण्याची शक्यता यामुळे हवामानाच्या अनिश्चिततेचे दर्शन घडत आहे. बुधवारी लातूर शहर आणि ग्रामीण भागात जोरदार पाऊस झाल्याने जनजीवन विस्कळीत झाले. गत आठ दिवसांपासून जिल्ह्यात वादळी वारे आणि विजांच्या कडकडाटासह पावसाचा हैदोस सुरू आहे. गत २० दिवसांत जिल्ह्यात सुमारे ८१ मि.मी. पाऊस झाला आहे. हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजापेक्षा जास्त पाऊस झाल्याने पेरणी करावी की नाही अशी शेतक-याची द्विधा मन:स्थिती झाली आहे. पेरणीनंतर पिकाची जोमात वाढ व्हावी यासाठी १०० मि.मी. पावसाची गरज असते. त्यामुळे शेतक-यांनी पेरणीसाठी घाई करू नये असे आवाहन कृषि विभागाने केले आहे. गत पंधरवड्यात मराठवाड्याला अवकाळी पावसाने झोडपून काढले आहे. वीज कोसळून २७ जणांचा मृत्यू झाला असून २१ जण जखमी झाले आहेत. ३९१ जनावरे मरण पावली आहेत. सुमारे ४ हजार हेक्टरहून अधिक शेतीचे नुकसान झाले आहे. मे महिन्याच्या सुरुवातीला शेतक-यांनी खरिपासाठी मशागत सुरू केली होती.परंतु ३ मे पासून अचानक अवकाळी पाऊस सुरू झाला. त्यामुळे मशागतीचे काम बंद पडले. वादळी वा-यासह झालेल्या पावसामुळे अनेक घरांचे छप्पर उडाले, विजेचे खांब आणि झाडे आडवी झाली. शेतपिकांचेही मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. डाळिंब, केळी, आंबा फळपिकांसह टोमॅटो, कांदे, बाजरी, भुईमूग पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. अवकाळी पावसामुळे नाशिक जिल्ह्यात दीड हजार हेक्टरचे नुकसान झाले. निफाड तालुक्यात कांदा, मका, भाजीपाल्याचे नुकसान झाले. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात हळद काढणीत व्यत्यय आला. विदर्भातील जिल्ह्यात गारपीट झाली. अतिवृष्टी, दुष्काळ, नैसर्गिक आपत्ती, अवकाळी पावसामुळे शेतपिके, फळबागांचे नुकसान होऊन उत्पन्न सरासरीपेक्षा कमी होत आहे. हवामान विभागाने शेतक-यांना आणि नागरिकांना सतर्क राहण्याचा सल्ला दिला आहे. काढणी केलेली पिके निवा-यात ठेवावीत. विजांचा कडकडाट होत असताना झाडाखाली थांबू नये. पाणी साचलेल्या रस्त्यांवर सावधपणे वाहन चालवावे अशा सूचना देण्यात आल्या आहेत.घरांना गळती लागणार नाही याची खात्री करा आणि स्वच्छ पाण्याचा साठा करा, असे आवाहनही करण्यात आले आहे. कोकणात एप्रिलच्या सुरुवातीलाच सलग दोन दिवस पाऊस पडला. त्यामुळे रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यात आंबा, काजूचे मोठे नुकसान झाले. उन्हाळ्यातील अवकाळी पावसामुळे शहरातील मध्यमवर्ग सुखावत असला तरी शेतक-यांना मात्र मोठा फटका बसतो. नाशिक जिल्ह्यात कांदा उत्पादकांचे मोठे नुकसान झाले. अवकाळीचा सर्वाधिक फटका अमरावती जिल्ह्याला बसला. संत्रा, कांदा, ज्वारी, मूग आणि केळी पिकांचे नुकसान झाले. नाशिक आणि जळगाव जिल्ह्यातील मका, ज्वारी, बाजरी, कांदा केळी यासह अनेक पिकांना फटका बसला. अवकाळी पावसाने दाणादाण उडवून दिली असली तरी पाण्याची टंचाई अजून दूर झालेली नाही. टँकरची संख्या वाढतच आहे. सर्वाधिक टँकर हे छत्रपती संभाजीनगर विभागात आहेत. हवामान बदलामुळे अवकाळीचा तडाखा वाढला आहे. पर्यावरणीय -हासाचा वेग पाहता २०५० पर्यंत हवामान बदलाचे प्रतिकूल परिणाम आपल्याला भोगावे लागणार आहेत. पाण्याचे नियोजन अत्यंत महत्त्वाचे आहे. देशामध्ये महिलांना जलसंकटाचा सामना सर्वाधिक करावा लागतो. मे महिना महाराष्ट्रात कडक उष्णतामानाचा महिना मानला जातो,परंतु यंदाचा मे महिना अजबच निघाला. मे महिन्यात असा दमदार पाऊस होणे दुर्मिळच. हवामानतज्ज्ञांच्या मते मे महिन्यातील या असामान्य पावसामागे अनेक कारणे आहेत. अरबी समुद्र आणि बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा निर्माण होण्याने, जूनच्या सुरुवातीला मान्सूनपूर्व प्रभाव दिसून येतो पण यंदा हवामानात झालेल्या बदलामुळे मान्सूनपूर्व पावसाला लवकर सुरुवात झाली. सध्या एल-निनोचा प्रभाव कमी झाल्याने वातावरणात आर्द्रता वाढून पाऊस शक्य झाला. मानवनिर्मित कारणांमुळे वातावरणातील अस्थिरता वाढली आणि त्यामुळे हवामानात अनपेक्षित बदल, वाढत्या शहरीकरणाचा प्रभाव, जंगलतोड इ. जिथे हवामान कोरडे असते तिथे मे महिन्यातील पाऊस दिलासा देतो मात्र, काही भागात आंबा, केळी, कापूस यासारख्या पिकांना फटका बसतो. पाणी टंचाई असलेल्या भागात हा पाऊस वरदान ठरू शकतो. यंदाचा मे महिना हवामानाच्या दृष्टीने अपवादात्मक ठरला. हा बदल तात्पुरता की कायमचा ते सांगणे कठीण आहे. अशा पावसासाठी जनतेने आणि प्रशासनाने सतर्क राहणे आवश्यक आहे.

# महाराष्ट्रात प्रदर्शित होणार 'अष्टपदी'

पुण्यभूमी प्रतिनिधी

पुणे :'अष्टपदी' हा मराठी चित्रपट ३० मे रोजी महाराष्ट्रातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. प्रदर्शित झालेला 'अष्टपदी'चा टिझर, ट्रेलर आणि गीत-संगीताने या चित्रपटाबाबतची उत्कंठा शिगेला पोहोचवण्याचे काम केले. प्रेमाच्या गुलाबी नात्याचे आजवर कधीही न उलगडलेले पैलू 'अष्टपदी'च्या निमित्ताने रसिकांसमोर सादर होणार आहेत. सोशल मीडियावरही या चित्रपटाला उदंड प्रतिसाद मिळत आहे. 'अष्टपदी'च्या रूपात रसिकांना एक संगीतप्रधान कौटुंबिक कलाकृती पाहायला मिळणार आहे.

महश्री प्रॉडक्शन आणि युवराज सिने क्रिएशनच्या बॅनरखाली निर्माते उत्कर्ष जैन आणि महेंद्र पाटील यांनी 'अष्टपदी' चित्रपटाची निर्मिती केली आहे. निर्माते उत्कर्ष जैन यांनीच 'अष्टपदी'चे दिग्दर्शनही केले आहे. कथा, पटकथा व संवादलेखन क्रिएटिव्ह दिग्दर्शक महेंद्र पाटील यांनी केलं आहे. आशयघन कथेवर लिहिण्यात आलेली नाट्यमय वळणांची पटकथा या चित्रपटाचे सर्वात मोठे बलस्थान आहे. आजच्या तरुणाईपासून अबालवृद्धांना आवडतील असे अर्थपूर्ण संवाद आणि प्रसंगानुरूप घटनाक्रम 'अष्टपदी'चे वैशिष्ट्य आहे. कथानकातील प्रत्येक व्यक्तिरेखेसाठी कलाकारांची केलेली अचूक निवड, दिग्दर्शकाने दाखवलेला विश्वास सार्थ ठरवत कलाकारांनी घेतलेली मेहनत, दिग्दर्शकाचे प्रयोगशील सादरीकरण, सुमधूर गीत-संगीत आणि दर्जेदार निर्मितीमूल्ये अशा एक ना अनेक कारणांमुळे हा चित्रपट रसिकांच्या आकर्षणाचे केंद्र बनला आहे.



खऱ्या प्रेमाची आजवर कधीही न समोर आलेली व्याख्या या चित्रपटाच्या निमित्ताने रसिकांसमोर येणार आहे. प्रेम म्हणजे केवळ दोन जीवांचा विचार नव्हे, तर त्याहीपलिकडे प्रेम आणि नातेसंबंधांचे आकाश खूप मोठे आहे. त्याच अवकाशाचा वेध या चित्रपटाच्या माध्यमातून दिग्दर्शक उत्कर्ष जैन यांनी घेतला आहे.

आजच्या समाजातील घटकांचे प्रतिबिंब मोठ्या पडद्यावर दाखवण्याचे काम 'अष्टपदी' करणार असल्याचे दिग्दर्शक उत्कर्ष जैन यांचे म्हणणे आहे. हा चित्रपट यशस्वी करण्यासाठी आणि कागदावर उतरवलेले पडद्यावर सादर करण्यासाठी 'अष्टपदी'च्या टिममधील सर्वच लहान-मोठ्या घटकाने खूप मेहनत घेतली असल्याचेही त्यांनी म्हटले. 'अष्टपदी' या चित्रपटाला जर आर्थिक यश लाभलं तर त्यातील काही भाग राष्ट्रीय संरक्षण निधीला देणार असल्याचे उत्कर्ष जैन यांनी सांगितले. आजच्या काळातील नातेसंबंधांवर भाष्य करणारा हा चित्रपट म्हणजे सर्वतोपरी मनोरंजनाचे परिपूर्ण पॅकेज असल्याचे 'अष्टपदी' पाहताना रसिकांना जाणवेल. या चित्रपटात संतोष जुवेकर, मयुरी कापडणे, अभिनव पाटेकर, मिलिंद फाटक, मोना कामत, स्वप्नील राजशेखर, माधव अभ्यंकर , विशाल अर्जुन, विनिता काळे, चंदा सारसेकर, कल्पना राणे, विशाल अर्जुन, उत्कर्ष जैन, महेंद्र पाटील, नयना बिडवे हे कलाकार विविध व्यक्तिरेखांमध्ये झळकणार आहेत. गणेश चेऊलकर आणि प्रशांत जामदार यांनी लिहिलेल्या अर्थपूर्ण गीतरचनांना संगीतकार मिलिंद मोरे यांनी सुमधूर स्वरसाज चढवला आहे. मिलिंद मोरे यांनीच या चित्रपटाला पार्श्वसंगीतही दिलं असून, कला दिग्दर्शन निलेश रसाळ यांनी केलं आहे. रंगभूषा अतुल शिधये यांनी, तर वेशभूषा अंजली खोब्रेकर व स्वप्ना राऊत यांनी केली आहे. डिओपी धनराज वाघ यांनी सिनेमॅटोग्राफी केली असून नृत्य दिग्दर्शन दिग्विजय जोशी यांनी केले आहे. अजय खाडे 'अष्टपदी'चे कार्यकारी निर्माते आहेत, तर राहुल पाटील आणि नंदू आचरेकर सहदिग्दर्शक आहेत.

## पान एक वरून

**बीड शहरातील नागरी समस्या**

बांधकाम पूर्ण करून सुरू करावे, तसेच रस्त्यांवरील खड्डे, सिमेंट रोडच्या सांधेबांध तातडीने कराव्यात. बेघर महिला निवारा गृह व नव्या स्मशानभूमीची उभारणी गरजेची असल्याचे सांगण्यात आले.आरोग्य विभागातील प्राथमिक आरोग्य केंद्रे अपुरी पडत असल्याने नव्या केंद्रांचा प्रस्ताव शासनाकडे पाठवावा, अशी सूचना करताना पेठ बीड, शाहूनगर भागांसाठी आरोग्य केंद्रांची गरज अधोरेखित करण्यात आली. कर वसुलीसाठी डिजिटल पद्धतीचा वापर करून गुगल पे, गुगल पेसारखी प विकसित करावी, तसेच व्यवसायिक गाळ्यांची नव्याने नोंदणी करून नगरपरिषदेला उत्पन्न वाढवण्याचा सल्ला देण्यात आला. शहराच्या वाढत्या लोकसंख्येनुसार फायर ब्रिगेडची नवी वाहने, भुयारी गटार योजना व एसटीपीसाठी जागा निश्चित करणे, रस्त्यांच्या दुतर्फा वृक्षारोपण व मियावाकी पद्धतीने दाट लागवड करणे अशाही सूचनांचा समावेश निवेदनात करण्यात आला. शहरातील नागरिकांनी वारंवार मांडलेल्या या समस्या तातडीने सोडवण्यात याव्यात, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने केली आहे. यावेळी माजी नगरसेवक बाबुराव दुधाळ, गणेश वाघमारे, भीमराव वाघचौरे, नरसिंग नाईकवाडे, सादेक जमा, भास्करराव जाधव, इकबाल शेख, विकास जोगदंड, प्रेम चांदणे, सतिश पवार, राणा चौहान, मुन्ना इनामदार, रवींद्र कदम, शुभम धुत, जैतुल्ला खान, बिभीषण लांडगे, नितिन साखरे, दत्ता जाधव, नसीर अन्सारी, बाळासाहेब आंबेकर, साऊद भाई, महेश गर्जे, नागेश तांबारे, मंगेश धोंगडे, विनोद हातागळे, डॉ.रमेश शिंदे, विठ्ठल गुजर, गजानन जवकर, शुभम कातांगळे, नामदेव गायकवाड, विशाल राऊत, भीमराव दळे, दगडू म्हेत्रे, प्रकाश कानगावकर, विद्याभूषण बेदरकर, जाफर इनामदार यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, नगरपरिषदेचे सर्व विभागाचे प्रमुख, नागरिक उपस्थित होते.

**शेत पिकाच्या नुकसानीचे**

शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळावी. यासाठी शेत पिकांच्या नुकसानीचे पंचनामे तातडीने करावेत. पंचनामे करण्यासाठी महसूल व कृषी विभागाने पथके गठीत करून ही कार्यवाही गतीने पूर्ण करावी. मंत्री श्री. जाधव – पाटील म्हणाले, अतिवृष्टी, पूर, अवेळी पाऊस, दुष्काळ, वादळी वारा व गारपीट या नैसर्गिक आपत्तींमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यास शासन नेहमीच प्राधान्य देत आहे. विविध नैसर्गिक आपत्तींमुळे बाधित झालेल्या शेत पिकांच्या नुकसानीपोटी सन २०२३- २०२४ या वर्षात ५४ लाख ८० हजार पात्र शेतकऱ्यांना ४ हजार ८३३ कोटी (चार हजार आठशे तेहतीस कोटी ) रूपये तर २०२४- २०२५ या आर्थिक वर्षात ६९ लाख ३ हजार शेतकऱ्यांना ६ हजार ९८९ कोटी ( सहा हजार नऊशे एकोणनव्वद) आणि १ एप्रिल २०२५ ते आतापर्यंत ९ लाख ७ हजार शेतकऱ्यांना ९७५ कोटी रुपयांची मदत देण्यात आली असल्याचे मदत व पुनर्वसन मंत्री श्री. जाधव-पाटील यांनी सांगितले.

**मानवतेला काळिमा**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, वैष्णवीचे बाळ स्वत:कडेच ठेवण्याचा आरोपींचा प्रयत्न होता. मात्र मी स्वत: पिंपरी-चिंचवडच्या पोलीस आयुक्तांना यात हस्तक्षेप करण्यास सांगितले. आता हे बाळ वैष्णवीच्या वडिलांच्या घरी पोहोचविण्यात आले आहे. वैष्णवीच्या अंगावर ज्या प्रकारे मारहाणीचे वळ होते, तिच्या ऑडिओ क्लिप्स तसेच वैष्णवीच्या घरच्यांनी दिलेली माहिती या आधारावर चौकशी करण्यात येईल.

**धुळे प्रकरणाची एसआयटी चौकशी** : धुळे शासकीय विश्रामगृहात सापडलेल्या रोकड प्रकरणाची सत्यता अजून समजलेली नाही. त्याची सत्यता बाहेर आली पाहिजे कारण विधानमंडळाच्या समितीवर प्रश्नचिन्ह उभे राहणे हे कदापि सहन करू शकत नाही. विधानमंडळाचा आपला एक मान आहे दूध का दूध पानी का पानी झाले पाहिजे असे सांगतानाच संपूर्ण घटनेची चौकशी एसआयटी नेमून करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. कोणी दोषी आहे, कोणी पैसे मागितले का याचा छडा लावण्यात येईल विधानसभेचे अध्यक्ष, विधानपरिषदेचे सभापती यांना देखील विनंती करून त्यांनी स्वतंत्रपणे एथिक्स कमिटी नेमून चौकशी करावी. विधानमंडळाची कोणत्याही परिस्थिती बदनामी सहन होणार नाही असेही ते म्हणाले.

**लातूरमध्ये लॉजवर नको**

आला आहे. लातूर पोलिसांच्या ए एच टी यु पथकाला याची माहिती मिळताच पोलिसांनी बनावट ग्राहक लॉजवर पाठविला. ग्राहकाने इशारा देताच पथकाने आनंद लॉजवर धाड टाकली. त्यावेळी दोन पीडित महिलांना आमिष दाखवून वेश्याव्यवसाय करून घेण्यात येत असल्याचे दिसून आले आहे.पोलिसांनी दोन पीडित महिलांची सुटका केली आहे. तर त्यांनी निरीक्षणात ठेवले आहे. या महिला परराज्यातील असल्याचे पोलिसांनी सांगितले. याप्रकरणी लॉज व्यवस्थापक व इतर साथीदार अशा सात जणांना लॉजवरून ताब्यात घेण्यात आले आहे. यामध्ये तुळजापूर येथील चार लोकांवर गुन्हा नोंद करण्यात आला आहे. यामध्ये तुळजाभवानी मंदिराचे पुजारी व क्रिकेटपटू यांचाही समावेश असल्याचेही पोलिसांनी सांगितले.

**कडा परिसराला पावसाचा**

आठवड्यापासून अवकाळी पावसाने जोरदार तडाखा दिला आहे. मागील आठवड्यापासून वातावरणात कमालीचा उकाडा जाणवत असून, ढगाळ वातावरण निर्माण झाले आहे. सलग तिसऱ्या दिवशी देखील पावसाने दमदार हजेरी लावली. या अवकाळी पावसामुळे शेतात पाणीच पाणी साचले आहे तर काही ठिकाणी वाऱ्याने विजेचे खांब कोसळले आहेत, त्यामुळे अनेक ठिकाणी वीज गायब झाल्याने नागरिक उकाड्याने त्रस्त झाले आहेत. शेतात साठवून ठेवलेला कांदाही पावसाने भिजल्याने कांदा उत्पादक शेतकऱ्यांसह फळबाग धारकांना देखील आर्थिक फटका बसला आहे.

**कड्याची तळेवस्ती अंधारात** : कडा परिसरात दोन दिवसापूर्वी वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसाने काही ठिकाणी विजेचे खांब पडले. त्यामुळे तीन दिवसापासून येथील तळेवस्तीवरील वीज गायब झाल्याने नागरिकांवर रात्र अंधारात काढावी लागत असल्याने वीज पुरवठा सुरुळीत करावा. अशी मागणी रघुनाथ कर्डीले यांनी केली आहे.

**आता ठेवीदार थेट मंत्रालयावर**

दिवाळखोरीत निघालेल्या आहेत. यामध्ये मराठवाड्यातील लाखों ठेवीदारांच्या ठेवी अडकल्या आहेत. ठेवीदारांच्या ठेवी परत मिळाव्या यासाठी ठेवीदार कृती समितीचे राज्य समन्वयक तथा स्वाभिमानी संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रा. सचिन उबाळे यांच्या नेतृत्वाखाली वारंवार उपोषण, आंदोलने करण्यात आली. आंदोलनामुळे सुरेश कुटे यांच्यासह जवळपास सर्वच मल्टिस्टेटमधील आरोपींना अटक झाली असून ज्ञानराधावर एमपीआयडी प्रस्ताव थेट मुख्यमंत्र्यांनी मंजूर केला. ईडीने ज्ञानराधाची प्रॉपर्टी जप्त केली. ठेवीदारासंदर्भात न्यायालयीन लढाई सुरू आहे, मात्र पुढे काहीच झाले नाही ? यामुळे न्यायालयीन लढा तीव्र करण्यासाठी व आंदोलनाची पुढील दिशा ठरविण्यासाठी प्रा.सचिन उबाळे यांच्या नेतृत्वाखाली आज अमृत मंगल कार्यालयात ठेवीदारांची बैठक झाली. यावेळी मल्टिस्टेट, पतसंस्थाप्रकरणाचा तपास संथ गतीने सुरू असल्याने ठेवीदारांनी संताप व्यक्त केला. ईडीने ज्ञानराधाच्या जप्त केलेल्या प्रॉपर्टी एमपीआयडी प्रस्तावात जोडून त्याचा तात्काळ लिलाव करुन ठेवीदारांच्या ठेवी परत द्या अशी मागणी करण्यात आली. जुनमध्ये ठेवीदारांच्या वतीने छत्रपती संभाजीनगर खंडपीठात पुन्हा याचिका दाखल करण्याचा निर्णय घेण्यात आला. आता मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधण्यासाठी थेट मंत्रालयावर धडकण्याचा निर्धार ठेवीदारांनी आजच्या बैठकीत घेतला. बैठकीस जिल्ह्यासह मराठवाड्यातील ठेवीदारा हजारोंच्या संख्येने उपस्थित होते.

**अर्चना कुटेंना आर्थिक गुन्हे शाखेचे अभय : प्रा.उबाळे**

बीडमधील मल्टिस्टेट, पतसंस्था प्रकरण राज्यभर गाजत आहे. ठेवीदारांनी आत्महत्या केल्याच्या घटना घडल्या आहेत. ज्ञानराधाचे प्रकरण ईडीपर्यंत गेले आहे. मात्र ज्ञानराधा प्रकरणातील आरोपी अर्चना कुटे अद्यापही पोलिसांना सापडत नाहीत. काही दिवसांपूर्वी झुम मिटिंगच्या माध्यमातून अर्चना कुटे यांनी ठेवीदारांशी संपर्क केल्याची माहिती आहे. ही माहिती खरी आहे का नाही याची चौकशीही पोलिसांनी केली नाही. एकूणच ज्ञानराधा प्रकरण सुरु झाल्यापासून आजपर्यंत अर्चना कुटेंना अटक होत नाही म्हणजे त्यांना बीड पोलिस आणि आर्थिक गुन्हे शाखेचे अभय असल्याचा आरोप प्रा.सचिन उबाळे यांनी केला आहे.

## पान सहा वरून

**दौंनापूरची ग्रामपंचायत म्हणते**

सुनील डोंगरे, पत्रकार केशव मुंडे, बहुजन विकास मोर्चाचे जिल्हाध्यक्ष प्रशांत ससाने, एकतावादीचे जिल्हाध्यक्ष शैलेंद्र पोटभरे, आर के आरसुळे, अंकुश गंगावणे, विठ्ठल ढोकणे, नितीन शिंदे ,भास्कर वाघमारे, वंचित ज्येष्ठ नेते भीमराव पायाळ, पत्रकार राजू जोगदंड, पत्रकार मिलिंद आदमाने, पत्रकार संतोष राजपूत, आझाद क्रांती सेना बीड कृष्णा पाटोळे इत्यादी अनेक मान्यवरांनी उपोषण स्थळी भेट देऊन पाठिंबा जाहीर केला.

**श्रमदानातून राबणार**

शिक्षिका, आशा वर्कर्स, अंगणवाडी कार्यकर्ती या विषयी जनजागृती करणार आहेत या सर्व उपक्रमांचे यशस्वी आयोजन गटविकास अधिकारी व संबंधित विभागांचे अधिकारी-कर्मचारी यांनी नियोजनपूर्वक करावे. प्रत्येक गावासाठी खतखडा भरण्याबाबत सूचना दिल्या आहेत त्याचे संनियंत्रण कर्मचारी करत आहे. या उपक्रमात सर्व ग्रामस्थांनी सक्रिय सहभाग घ्यावा व हे उपक्रम यशस्वी करावेत, असे आवाहन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केले आहे.

**बीडमध्ये दोन बालविवाह**

अधीक्षक श्री.नवनीत काँवत, अप्पर पोलीस अधीक्षक श्री. सचिन पांडकर यांचे मार्गदर्शनाखाली पथक प्रमुख सहाय्यक पोलीस निरीक्षक वर्षा व्हगाडे, पोलीस अंमलदार अशोक शिंदे, प्रदीप येवले, मनीषा खरमाटे, रूपाली टोणे,यांचेसह बालविवाह अधिकारी ग्रामसेवक एस. बी. सपकाळ, व सामाजिक कार्यकर्ते तत्त्वशील कांबळे यांनी केली.

**सीईओ आशिष येरेकर**

नाविन्यपूर्ण प्रयोग राबविलेजलजीवन मिशन सारख्या केंद्र सरकारच्या महत्वकांक्षी योजनेची नगर जिल्ह्यामध्ये प्रभावी अंमलबजावणी यांच्या कार्यकाळात झाली अतिशय शिस्तप्रिय अधिकारी म्हणून त्यांनी जिल्हा परिषद कामगिरी केली होती अनेक विभागांमध्ये प्रशासकीय वचक त्यांनी निर्माण केला अधिकारी व कर्मचाऱ्यांना वेळेतच उपस्थित राहण्याचे नियम व शिस्त त्यांचाच काळात सुरू झाली.

**रेशन कार्ड धारकांची ई**

राहून ई पॉस मशीन वर इळोशीेळल ीहशपीेळलरीेंळप व चेलळश्रश रिं द्वारे ऋलश ीहशपीेळलरीेंळप करून ई केवायसी पूर्ण करून घ्यावा व सर्व तालुक्यातील रास्त भाव दुकानदाराने आप आपल्या गावात कॅम्पचे आयोजन करून ई केवायसी पूर्ण करून घ्यावी असे आवाहन कळंबचे तहसीलदार श्री.हेमंत ढोकले,पुरवठा निरीक्षण अधिकारी श्रीमती शिल्पा माळवे आणि सहायक महसूल अधिकारी आर. डि.पवार यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे केले आहे.

**खबरदार ड्रोन उडविणे महागात**

दृष्टिकोनातून संपूर्ण बीड जिल्ह्यात दिनांक १४ मे २०२५ पासून ते ३ जून २०२५ पर्यंत तातडीचे परिस्थितीत, नमूद कालावधी करिता भारतीय नागरी सुरक्षा संहिता कलम १६३ (१)(३) अन्वये आदेश लागू करणेस विनंती करण्यात आली आहे. तरी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ (२) मधील शक्तीचा वापर करून नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून बीड जिल्हा हद्दीत दि. १६ मे २०२५ ते ३ जून २०२५ या कालावधीत ड्रोन कॅमेरा, मानवरहीत यंत्र चालविण्यास किंवा उडविण्यास मनाई आदेश एकतर्फी पारीत करण्यात येत आहे, असे बीडचे अपर जिल्हादंडाधिकारी यांनी नमुद केले आहे.

**नागरी समस्या तातडीने**

आरोग्य केंद्रांची गरज अधोरेखित करण्यात आली. कर वसुलीसाठी डिजिटल पद्धतीचा वापर करून गुगल पे, गुगल पेसारखी प विकसित करावी, तसेच व्यवसायिक गाळ्यांची नव्याने नोंदणी करून नगरपरिषदेला उत्पन्न वाढवण्याचा सल्ला देण्यात आला. शहराच्या वाढत्या लोकसंख्येनुसार फायर ब्रिगेडची नवी वाहने, भुयारी गटार योजना व एसटीपीसाठी जागा निश्चित करणे, रस्त्यांच्या दुतर्फा वृक्षारोपण व मियावाकी पद्धतीने दाट लागवड करणे अशाही सूचनांचा समावेश निवेदनात करण्यात आला. शहरातील नागरिकांनी वारंवार मांडलेल्या या समस्या तातडीने सोडवण्यात याव्यात, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने केली आहे. यावेळी माजी नगरसेवक बाबुराव दुधाळ, गणेश वाघमारे, भीमराव वाघचौरे, नरसिंग नाईकवाडे, सादेक जमा, भास्करराव जाधव, इकबाल शेख, विकास जोगदंड, प्रेम चांदणे, सतिश पवार, राणा चौहान, मुन्ना इनामदार, रवींद्र कदम, शुभम धुत, जैतुल्ला खान, बिभीषण लांडगे, नितिन साखरे, दत्ता जाधव, नसीर अन्सारी, बाळासाहेब आंबेकर, साऊद भाई, महेश गर्जे, नागेश तांबारे, मंगेश धोंगडे, विनोद हातागळे, डॉ.रमेश शिंदे, विठ्ठल गुजर, गजानन जवकर, शुभम कातांगळे, नामदेव गायकवाड, विशाल राऊत, भीमराव दळे, दगडू म्हेत्रे, प्रकाश कानगावकर, विद्याभूषण बेदरकर, जाफर इनामदार यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, नगरपरिषदेचे सर्व विभागाचे प्रमुख, नागरिक उपस्थित होते.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**

हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com

Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122

Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com



## उबाठा पदाधिकाऱ्यांचा भाजपात प्रवेश

**भाईंदर :** मीरा-भाईंदर उबाठामधील नेतृत्वाचा अभाव त्यामुळे दिशाहीन वाटचाल, तर शिवसेनेतील अंतर्गत लाथाळी आणि नेतृत्वाच्या हातातील ठराविक बाहुल्या याला कंटाळून उबाठा आणि शिवसेनेच्या २० पदाधिकाऱ्यांसह अनेकांनी आमदार नरेंद्र मेहता यांच्या दूरदृष्टी आणि गतिमान कार्याला प्रभावित होऊन भाजपात प्रवेश केला आहे. भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ कार्यकर्ते डॉ. सुरेश येवले यांच्या मार्गदर्शनाखाली उबाठाचे विभाग प्रमुख संतोष डेरे यांच्या नेतृत्वाखाली आशीष शुक्ला, प्रिया श्रॉप, प्रकाश आर्या, सुरेश पाल, निशांत सूर्यवंशी, नवीन पांडे, आलोक पाठक, ब्रज श्रॉप या पदाधिकाऱ्यांसह अनेक कार्यकर्त्यांनी उबाठाला अखेरचा जय महाराष्ट्र करत भाजपात प्रवेश केला, तर शिवसेनेच्या कल्पना पारंगे यांच्या नेतृत्वाखाली तेजल धोंडिया, गीता राऊल, ममता तेपण, रिना पाल, कलावती शर्मा, प्रिया शोर्फ, सुरज आर्या, दिव्या दोडिया या पदाधिकाऱ्यांसह अनेक कार्यकर्त्यांनी भाजपात प्रवेश केला. आमदार नरेंद्र मेहता यांनी सर्वांचे स्वागत केले.

# उल्हास नदीत भरावा प्रकरणी १० कोटींचा दंड

## सत्संग विहार संस्थेला नोटीस, ७ दिवसांत दंड भरण्याचे आदेश

◆ बदलापूर (वार्ताहर) :

उल्हास नदी पात्रात करण्यात आलेल्या मातीच्या भरावा प्रकरणी अखेर अंबरनाथ तहसिलदार कार्यालयाकडून सत्संग विहार संस्थेच्या व्यवस्थापकांना १० कोटी १६ लाख १७ हजार १४१ रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे. सत्संग विहार यांनी अनधिकृतरित्या उल्हासनदी पात्रात केलेला भराव हा ८ हजार ९१२ ब्रास माती, १९६ ब्रास दगड आणि ८३ ब्रास दगड पावडर इतका आहे. त्यामुळे या गौण खनिजाचा दंड ९ कोटी ९३ लाख ६७ हजार १४१ इतका आहे. तर या भरावासाठी वापरण्यात आलेली यंत्र समुग्रीचा जातमुचलका रक्कम २२ लाख ५० हजार इतकी आहे. हा दंड येत्या सात दिवसात जमा करण्याचे आदेश अंबरनाथचे तहसीलदार अमित पुरी यांनी दिले आहेत.



बदलापूर शहरातील वाहणाऱ्या उल्हास नदीच्या पात्रात पश्चिम येथील हेंद्रेपाडा येथे असलेल्या सत्संग विहार या संस्थेच्या वतीने मोठ्या प्रमाणावर मातीचा भराव टाकण्यात आला. त्यामुळे उल्हास नदीचे पात्र बदलले आहे, असा दावा पर्यावरण रक्षणासाठी लढणाऱ्या वनशक्ती संस्थेच्या वतीने करण्यात आला आहे. या विरुद्ध स्थानिक नागरिकांनी आवाज उठवल्यानंतर हे काम बंद करण्यात आले. नदीपात्रात सपाट जमीन तयार करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप नागरिकांचा होता. याप्रकरणी अंबरनाथ तहसील कार्यालयाने तक्रारीनंतर पंचनामा केला तसेच येथील काम बंद पाडले. त्यानंतर या प्रकरणी कारवाई व्हावी अशी मागणी जोर धरू लागली. स्थानिक, लोकप्रतिनिधी आणि पर्यावरण प्रेमींच्या रेट्यानंतर या प्रकरणी अंबरनाथ तहसील कार्यालयाने दंडात्मक कारवाईचे आदेश काढले.

अंबरनाथ तहसील कार्यालयाने केलेल्या पंचनाम्यानुसार सत्संग विहार यांनी उल्हास नदी पात्रात तब्बल ८ हजार ९१२ ब्रास माती, १९६ ब्रास दगड आणि ८३ ब्रास दगड पावडर इतका भराव अनधिकृतपणे टाकला आहे. त्यामुळे या गौण खनिजाचा तब्बल ९ कोटी ९३ लाख ६७ हजार १४१ इतका दंड लावण्यात आला आहे. तर या अनधिकृत भरावासाठी वापरण्यात आलेली यंत्र सामग्रीचा जातमुचलका म्हणून एकूण २२ लाख ५० हजारांची रक्कम भरावी लागणार आहे. सत्संग विहार संस्थेच्या मुख्य व्यवस्थापकांना याप्रकरणी दंडाचा आदेश बजावण्यात आला आहे. या दंडाची रक्कम आदेश मिळाल्यापासून ७ दिवसाच्या आत शासनाच्या खाती जमा करायाची आहे, अशी माहिती अंबरनाथचे तहसीलदार अमित पुरी यांनी दिली आहे.

### महाराष्ट्रातील पहिल्या तृतीयपंथी रिक्षाचालक

# ठाण्यात ई-रिक्षाचे पदार्पण



◆ ठाणे (प्रतिनिधी) :

पुरुष रिक्षा चालकानंतर, महिला रिक्षाचालक आल्या. आता पहिल्यांदा ठाण्यात ई-रिक्षांचे देखील पदार्पण झाले. यात देखील महिलांनी आघाडी घेतली आहे. विधवा, परितक्त्या, तृतीयपंथी, कचरावेचक महिलांना मोफत ई-रिक्षाचे वाटप रोटरी क्लब ऑफ लेक सिटी, समर्थ भारत व्यासपीठ यांच्या वतीने करण्यात आले. महिला सक्षमीकरणासाठीच्या या रिक्षा ठाण्यात नवा संदेश देतील असा विश्वास व्यक्त करण्यात आला. करीना आडे या महाराष्ट्रातील पहिल्या तृतीयपंथीय महिला रिक्षाचालक ठरल्या.

पर्यावरण रक्षणासाठी सध्या इलेक्ट्रीक वाहनांची सद्दी सुरु झाली आहे. मात्र सर्वाधिक संख्येने असलेल्या रिक्षा या वाहन प्रकारात अजूनही ई-रिक्षा महाराष्ट्रात आल्या नव्हत्या. समर्थ भारत व्यासपीठ रोटरी क्लब ऑफ लेक सिटी आणि ॲटॉस इंडिया कंपनीच्या पुढाकाराने ठाण्यातील विधवा, परितक्त्या, तृतीयपंथी, कचरावेचक १५ महिलांना मोफत ई-रिक्षा देण्याचा अभिनव उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमाचा भाग म्हणून आज ५ जणींना ई-रिक्षा सुपूर्द करण्यात आल्या. रिक्षा चालविण्याचे प्रशिक्षण, वाहन परवाना, बॅच व ई-रिक्षा मोफत देत समाजातील दुर्लक्षित व आर्थिकदृष्ट्या कमकुवत अशा महिलांच्या सक्षमीकरणासाठी या रिक्षा सहाय्यभूत ठरणार आहेत.

जिल्हा न्यायाधीश सोन शहा, वाहतूक उपायुक्त पंक शिरसाट, रोटरीचे डीस्ट्रीक्ट गर्व्ह दिनेश मेहता, असिस्टंट मानसिं खाडे, ठामपा शिक्षण उपायुव सचिन सांगळे, क्लब प्रेसिडं जगदीश चेलारामानी, समर्थ भार व्यासपीठाचे संचालक उल्हास काले निखिल सुळे, निवृत्त आरटीः अधिकारी कमलेश चव्हाण, प्रसा तेंडुलकर, अनिरुद्ध वैरागक प्रफुल्ल रुईवाले, अनुराधा रोडे यांच प्रमुख उपस्थितीत नौपाड्याती रोटरी सेंटर येथे रिक्षा वाटपा कार्यक्रम संपन्न झाला.

ठाणे परिसरात गेल्या का महिन्यात जवळपास २० जणां अपघाती मृत्यू झाला. वाहतुकी नियम चालकांनी पाळले तर अने घरातील कर्ती व्यक्ती अपघातातृ मृत्युमुखी पडण्यापासून वाचे महिला रिक्षाचालक वाहतुकीच नियमांचे योग्य पालन करतील आ समर्थ रिक्षा या आदर्श रिक्षा ठरती असा आशावाद वाहतूक पोली उपायुक्त पंकज शिरसाट यां यावेळी बोलताना व्यक्त केला.

रिक्षा वाटपाचा पुढील टप आंतरराष्ट्रीय पर्यावरण दिनाच निमित्ताने ५ जून रोजी होणार आ त्यावेळेस उर्वरित ११ महिलां रिक्षा वाटप करण्यात येईल. आ तृतीय पंथीय करीना आडे हिच्यास सविता रणपिसे, रत्नावली जाधव संगीता मांजरेकर, उज्वला शिं या महिलांना मोफत रिक्षांचे वाट करण्यात आले.

## वेचक

### माजी पंतप्रधान स्व. राजीव गांधी यांना अभिवादन!




**कल्याण :** महापालिका मुख्यालयात आज दहशतवाद व हिंसाचार विरोधी तसेच स्व. राजीव गांधी यांच्या स्मृतिदिनानिमित्त महापालिका सचिव किशोर शेळके यांनी स्वर्गीय राजीव गांधी यांचे प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली. या समयी पुनर्वसन विभागाचे प्रभारी सहाय्यक आयुक्त दत्तात्रय लदवा यांचे समवेत उपस्थित अधिकारी / कर्मचारी वर्गांने दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिनानिमित्त शपथ घेतली. या समयी सुरक्षा अधिकारी भरत बुळे ,सहाय्यक सुरक्षा अधिकारी सुरेश पवार, सहाय्यक जनसंपर्क अधिकारी सुमित बोयत तसेच महापालिकेचे इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

### बालविवाह रोखण्यात प्रशासनाचे यश

**ठाणे :** शहापूर तालुक्यातील वेळुक कातकरी वाडी येथे प्रशासनाच्या सतर्कतेमुळे यशस्वीरीत्या बालविवाह रोखण्यात आला. या कारवाई दरम्यान बालविकास प्रकल्प अधिकारी धनश्री साळुंखे, पोलीस निरीक्षक सुरेश गावित (कसारा पोलीस ठाणे), पोलीस उपनिरीक्षक सागर जाधव, जिल्हा महिला व बाल विकास कार्यालयाच्या प्रतिनिधी दिपाली कांबळे, सेवा सामाजिक संस्थेच्या सुरेखा विशे, पर्यवेक्षिका कसारा-१, तसेच मुख्य सेविका कविता जगताप यांनी संयुक्तरीत्या तत्काळ कारवाई करत बालविवाह थांबवला. विशेषतः मुख्य सेविका कविता जगताप यांनी प्रकरणाची माहिती मिळताच तत्परतेने प्रयत्न करून मोठ्या मेहनतीने हा बालविवाह थांबवण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावली. २०२४ मध्ये बालविवाहाची १८ प्रकरणे, तर २०२५ मध्ये आजअखेर ६ प्रकरणे यशस्वीरीत्या रोखण्यात आली आहेत.

### योगेंद्र बांगरांना आदर्श शिक्षक पुरस्कार



**मुरबाड :** विविध सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक उपक्रम राबविण्यात मुरबाड तालुक्यात आघाडीवर असणारे इतिहास संशोधक, निसर्ग अभ्यासक, शिक्षक योगेंद्र बांगर यांना मुंबई येथे ख्यातनाम हुंडा विरोधी चळवळीच्या वतीने देण्यात येणारा मानाचा पुरस्कार विख्यात अर्थतज्ज्ञ डॉ. विभूती पटेल यांच्या हस्ते नुकतेच प्रदान करण्यात आला. रुपये १००० रोख, मानधन, सन्मानपत्र, सन्मानचिन्ह, खादी सुताचा हार, श्रीफळ, २५ ग्रंथ, भेटवस्तू या सह लोकमान्य सेवा संघ, गोखले सभागृह विलेपार्ले येथे बांगर यांचा सन्मान करण्यात आला. समाजसेविका लता नायक मुंबई, डॉ.मिलिंद भोई पुणे यांचाही विशेष सन्मान या कार्यक्रमात करण्यात आला.

### विलास समेळ यांना कलारत्न पुरस्कार जाहीर

**नवी मुंबई :** नवरंग साहित्य संस्कृती व कला मंडळाच्या वतीने विविध विभागात गुणवंत कामगिरी करणाऱ्या घटकांना पुरस्कार देण्यात येतो. यावर्षी देखील हे पुरस्कार जाहीर झाले आहेत. यामध्ये मराठी भाषेचा ध्यास घेणारे व तळागाळातील विद्यार्थ्यांना सुंदर अक्षर गिरवायला लावणाऱ्या तसेच नागरिकांना मराठी भाषेविषयी महत्त्व सांगणाऱ्या ७३ वर्षीय सुलेखनकार विलास समेळ यांना नवरंग कलारत्न पुरस्कार जाहीर झाला आहे. तसेच शिल्पकार, चित्रकार, संगीत अलंकार, वक्ता, रांगोळीकर अशा विविध घटकांना नवरंग कलारत्न पुरस्कार जाहीर झाला आहे. हे पुरस्कार ८ जून रोजी कोपरखैरणे येथील ज्ञानविकास शिक्षण संस्था संकुल येथे एकदिवसीय रंगधनू नवरंग साहित्य संमेलन २०२५ मध्ये सन्मानपूर्वक देण्यात येणार आहेत. सदर पुरस्काराच्या नामांकनामध्ये शिपकर मोरेश्वर पवार, प्रसिद्ध चित्रकार जगदिश कर्जेकर, संगीत अलंकार शशीकांत पारगावकर, फर्डे वक्ते राजाराम पाटील, प्रसिद्ध रांगोळीकर श्रीहरी पवळे मास्तर आदींचा समावेश आहे.

## 'सप्तशृंगी इमारत दुर्घटनेतील जखमींवर तातडीने उपचार करा'

◆ ठाणे (प्रतिनिधी) :

कल्याण पूर्व येथील मंगलराघो नगर परिसरातील सप्तशृंगी इमारतीचा स्लॅब कोसळून झालेल्या दुर्घटनेतील जखमींवर तातडीने उपचार करावेत. तसेच ढिगाऱ्याखाली अडकलेल्या नागरिकांना लवकरात लवकर बाहेर काढून सदर इमारतीतील इतर रहिवाशांना सुरक्षित स्थळी स्थलांतरित करावे असे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत. तसेच या दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांच्या नातेवाईकांना जिल्हा आपत्ती निवारण निधीतून मदत देण्यास त्यांनी सांगितले.



कल्याण पूर्व येथील या इमारतीचा तिसऱ्या मजल्यावर सुरू असलेल्या बांधकामावेळी अचानक मधला स्लॅब कोसळून थेट तळमजल्यावर आल्याने मोठी दुर्घटना घडली. या दुर्घटनेत चार जणांचा मृत्यू झाला असून हा आकडा वाढण्याची भीती आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना या इमारत दुर्घटनेची माहिती मिळताच त्यांनी जिल्हाधिकारी अशोक शिनगारे आणि कल्याण डोंबिवली मनपाचे आयुक्त अभिनव गोयल यांच्याकडून या दुर्घटनेची सविस्तर माहिती जाणून घेतली. तसेच त्यानंतर त्यांनी बचाव कार्याला वेग आणण्यासाठी पोलीस कर्मचारी आणि अग्निशमन दलाची अतिरिक्त कुमक घटनास्थळी बोलवण्यास सांगितले. तसेच या दुर्घटनेत जखमी झालेल्या रहिवाशांवर गरज असल्यास खाजगी रुग्णालयात दाखल करून त्यांच्यावर उपचार करावेत असेही निर्देश दिले. तसेच यात ज्यांचा मृत्यू झाला त्यांच्या कुटूंबियांना लवकरात लवकर शासकीय मदत दिली जाईल असेही सांगितले. तसेच या बचाव कार्याचा आढावा घेऊन ठाणे जिल्हाधिकारी आणि पालिका आयुक्त यांनी स्वतः त्यात जातीने लक्ष घालावे असेही निर्देश दिले. या दुर्घटनेनंतर सुरू करण्यात आलेल्या मदतकार्याचा उपमुख्यमंत्री शिंदे स्वतः वेळोवेळी आढावा घेत असून लागेल ती सर्व मदत करण्याची तयारी त्यांनी दर्शवली आहे.

### ठाणे जिल्हाध्यक्षपदी नजीब मुल्ला यांची नियुक्ती

**ठाणे :** आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या तसेच महापालिका निवडणुका डोळ्यांसमोर ठेवून पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजितदादा तसेच प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी पक्ष संघटना बांधणीच्या दृष्टीकोनातून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस पदी आनंद परांजपे यांच्यावर जबाबदारी सोपविली आहे. तसेच ठाण्यातही राष्ट्रवादीचा वरचष्मा कायम राहावा यासाठी ठाणे गडाची सुभेदारी नजीब मुल्ला यांच्यावर सोपविण्यात आली आहे.

राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या सक्षम नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची वाटचाल जोमाने सुरु आहे. ठाण्यातही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने युवकांना संधी देण्याचे धोरण ठरवले आहे.

# पोशीर, शिलार प्रकल्पांना राज्य मंत्रिमंडळाची मान्यता

◆ बदलापूर (वार्ताहर) :

मुंबई महानगर प्रदेशातील वाढत्या नागरीकरणामुळे पिण्याच्या पाण्याची आवश्यकता लक्षात घेता पोशीर व शिलार या सुमारे १९ टी.एम.सी. पाणीसाठा करणाऱ्या प्रकल्पासाठी अनुक्रमे ६ हजार ३९४ कोटी व ४ हजार ८६९ कोटी रुपये खर्चाच्या अंदाजपत्रकास राज्य मंत्रिमंडळाने प्रशासकीय मान्यता दिली आहे. या प्रकल्पामुळे मुंबई महानगर प्रदेशातील नागरिकांना पिण्याचे पाणी उपलब्ध होणार असल्याची माहिती जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी दिली.

काल मंत्रालयात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षेतेखाली झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत या प्रकल्पांसाठी खर्चाच्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात आली. मंत्री गिरीश महाजन यांनी सांगितले, हे दोन्ही प्रकल्प रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यात आहेत. या प्रकल्पांचे पाणी मुंबई महानगर, नवी मुंबई, उल्हासनगर, अंबरनाथ, बदलापूर आदी शहरांना पिण्याच्या पाण्याकरिता पुरविले जाणार आहे. पोशिर , शिलार या धरणासाठी माजी खा. दिवंगत राम कापसे आणि बदलापूरचे माजी नगराध्यक्ष राम पातकर यांच्या प्रयत्नांना यश आले आहे.

### लसूण ३० ते ४० रुपयांनी महागला

**नवी मुंबई :** गेल्या महिन्यापर्यंत लसूण दर स्थिर असल्याने सर्वसामान्यांना काहीसा दिलासा मिळाला होता. मात्र आता पुन्हा १५ ते २० टक्क्यांनी लसणाचे दर वाढले असून, लसूण ३० ते ४० रुपयांनी महागला आहे. वाशी येथील मुंबई एपीएमसी कांदा-बटाटा बाजारात लसूण आवक घटल्याने दरात पुन्हा एकदा वाढ पाहायला मिळत आहे. घाऊक बाजारात उटी व्हीआयपी ड्राय लसूण १३० ते १५० रुपये प्रति किलो, देशी व्हीआयपी १२० ते १४० रुपये प्रति किलो, तर देशी सुट्टा लसूण ६० ते ९० रुपये किलोने विकला जात आहे. किरकोळ बाजारातही लसणाचे दर १४० ते २०० रुपये किलोपर्यंत पोहोचले आहेत.

## उदयोन्मुख कलाकारांसाठी पालिकेची संडे गार्डन संकल्पना

◆ भाईंदर (वार्ताहर) :

उद्यानात येणाऱ्या नागरिकांचे मनोरंजन करण्याच्या दृष्टीने तसेच शहरातील नागरिक आणि उदयोन्मुख कलाकारांच्या कलागुणांना वाव देऊन त्यांच्यातील कला सादर करण्यासाठी खुला मंच उपलब्ध करून देणारा 'संडे गार्डन' हा अभिनव उपक्रम महापालिकेने सुरू केला आहे. महापालिका आयुक्त राधाबिनोद शर्मा यांच्या संकल्पनेतून मे महिन्यातील दर रविवारी संडे गार्डन हा उपक्रम राबविण्यात येत आहे १८ मे रोजी या अनोख्या कार्यक्रमाचे तिसरे पर्व मीरा रोडच्या रामदेव पार्क येथील ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले उद्यान आणि कनाकिया उद्यानात मोठ्या उत्साहात



पार पडले. कार्यक्रमात १४ वर्षीय जादुगार स्वरांग रणदिवे याने आपल्या जादुई खेळाने सगळ्यांना मंत्रमुग्ध केले. गिटार वादक आहान माथूर याच्या गिटार वादनाला नागरिकांची दाद मिळाली. सर्व ठिकाणी लहान मुलांनी गायन, नृत्य, नकला सादर केल्या, तर ज्येष्ठ नागरिकांनी भजन, गीते सादर केली. यावेळी उपायुक्त प्रसाद शिंगटे, कार्यकारी अभियंता शरद नानेगावकर, माहिती व जनसंपर्क अधिकारी राज घरत, वि अधिकारी सई वडके, सहा. आयुव प्रियंका भोसले, उद्यान अधिक्ष नागेश वीरकर व इतर कर्मचारी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थि होते. येत्या रविवारी २५ मे रो मीरा रोडच्या ज्ञानज्योती सावित्रीब फुले उद्यान, भाईंदर येथील जेस पार्क उद्यान, सालासर हनुमा उद्यानात संडे गार्डनचे शेवट सत्र होणार आहे.



### '...आणि पुनश्च एव्हरेस्ट' पुस्तकाचे प्रकाशन

**ठाणे :** शिवसेना मुख्य नेते व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते गिर्यारोहक शरद कुलकर्णी लिखित 'ती, मी आणि पुनश्च एव्हरेस्ट' या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. ठाण्यातील काशिनाथ घाणेकर नाट्यगृह येथे आयोजित केलेल्या या पुस्तक सोहळ्यात नव्याने गिर्यारोहक बनू इच्छिणाऱ्या आजच्या तरुण पिढीसाठी हे पुस्तक मार्गदर्शक ठरणार असल्याचे उपमुख्यमंत्री यांनी सांगितले. याप्रसंगी ज्येष्ठ पत्रकार उदय निरगुडकर, माजी नगरसेवक मनोज शिंदे, डॉ. नितीन देशपांडे आणि गिर्यारोहण क्षेत्रातील अनेक मान्यवर तसेच ठाणेकर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नगर परिषदेचा बेघर निवारा उपक्रम कौतुकास्पद

◆ अंबरनाथ (वार्ताहर) :

अंबरनाथ नगर परिषद पालिकेच्या वतीने केंद्र शासनाच्या दीनदयाळ अंत्योदय योजनेत राष्ट्रीय उपजीविका अभियानाअंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या शहरी बेघर निवाऱ्याची यशस्वी अंमलबजावणी सध्या राज्यभरात कौतुकास पात्र ठरत आहे. सध्या या निवाऱ्यात ३६ बेघर लाभार्थ्यांना मोफत निवास, जेवण व सर्व आवश्यक सुविधा पुरवण्यात येत असून, त्यांच्या पुनर्वसनासाठी विविध उपक्रम राबवले जात आहेत.

रस्त्यावर, रेल्वे स्थानक परिसरात राहणाऱ्या आणि कोणताही आधार नसलेल्या नागरिकांसाठी हा निवारा कायमस्वरूपी सुरू करण्यात आला आहे. लाभार्थ्यांच्या देखभालीसाठी व्यवस्थापक व काळजीवाहक कार्यरत असून, आरोग्य शिबिरे, शासनाच्या विविध योजनांचा लाभ इत्यादी सुविधा देखील नियमितपणे दिल्या जात आहेत. या उपक्रमामुळे अंबरनाथमधील बेघर नागरिकांना





सुरक्षित आणि सन्मानजनक जीवनशैली प्राप्त झाली आहे. या उल्लेखनीय कामगिरीची दखल मा. राज्यसह नियंत्रण समितीने घेतली असून, महाराष्ट्रातील पाच सर्वोत्कृष्ट शहरी बेघर निवाऱ्यांमध्ये अंबरनाथची निवड करण्यात आली आहे. पिंपरी-चिंचवड, बीड, अकोला, अंबरनाथ व बृहन्मुंबई या निवाऱ्यांनी घेतलेले कष्ट व सातत्यपूर्ण प्रयत्न यामुळेच ही निवड शक्य झाली.

या यशस्वी अंमलबजावणीमागे मा. उमाकांत गायकवाड साहेबांचे लाभलेले मार्गदर्शन व सहकार्य हे अत्यंत मोलाचे ठरले आहे. त्यांच्या मार्गदर्शनामुळेच निवाऱ्याच्या व्यवस्थापनाची गुणवत्ता उंचावली असून, लाभार्थ्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणता आला आहे. अंबरनाथ नगरपरिषदेचा हा उपक्रम अन्य शहरी भागांसाठी प्रेरणादायी ठरत असून, सामाजिक बांधिलकीच्या दृष्टिकोनातून ही कामगिरी उल्लेखनीय आहे.

## माजी नगरसेवक सुधीर कोकाटे यांच्यावर प्राणघातक हल्ला

◆ ठाणे (प्रतिनिधी) :

शिवसेना शिंदे गटाचे माजी नगरसेवक व दिवंगत नेते आनंद दिघे यांचे जवळचे सहकारी सुधीर कोकाटे यांच्यावर टेंभीनाका परिसरात चॉपरने जीवघेणा हल्ला करण्याचा प्रयत्न झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या हल्ल्यात कोकाटे यांचे सहकारी गजानन म्हात्रे जखमी झाले असून, महिलेच्या नेतृत्वाखाली आलेल्या चार ते पाच जणांविरोधात ठाणेनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही घटना सोमवारी रात्री घडली. कोकाटे हे त्यांचे सहकारी किशोर गायकर, गजानन म्हात्रे, प्रसाद कांबळे आदींसह नवरात्र मंडळाच्या कार्यालयाबाहेर नेहमीप्रमाणे कामानिमित्त बसले होते. त्याचवेळी एक महिला आणि चार जण रिक्षा व दुचाक्यांवरून आले. महिलेने थेट कोकाटे यांना उद्देशून जीवे मारण्याची धमकी दिली आणि एका तरुणा चॉपर काढून हल्ला करण्याचा प्रयत केला. गजानन म्हात्रे यांना हाताव आणि पाठीवर मार लागल्या माहिती आहे. विशेष म्हणज काही दिवसांपूर्वी कोकाटे यांच मुलावर नौपाडा पोलीस ठाण्या एका तरुणावर हल्ल्याप्रकरणी गुन् दाखल करण्यात आला होता. ही पार्श्वभूमी लक्षात घेता, हे सूडा कारस्थान असल्याचा प्राथमि अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे

सुधीर कोकाटे हे शिवसेने गेली ४० वर्षे सक्रिय असून, ठा महापालिकेवर चार वेळा निवडू आलेले आहेत. आनंद दि यांच्या कार्यशैलीचे ते निष्ठावा प्रतिनिधी मानले जातात. ही घट आनंद आश्रमापासून अवघ्या दो मिनिटांच्या अंतरावर घडल्या शहरात खळबळ उडाली आहे. प्रकरणी ठाणे नगर पोलीस पुढी तपास करत आहेत.

### मुरबाड तालुक्यातील वीट भट्टीवाल्यांचेही मोठे नुकसान

# पावसाने थैमान घातल्यामुळे २० तास वीज पुरवठा खंडित!

◆ मुरबाड (वार्ताहर) :

मुरबाड तालुक्यातील ग्रामीण आदिवासी पट्टा तसेच मुरबाड शहर परिसरात मागील दहा ते बारा दिवस मोठ्या प्रमाणात अवकाळी पावसाने थैमान घातल्याने सर्वच ठिकाणी जनजीवन विस्कळीत झाल्याचे चित्र दिसून येत आहे. वादळी वाऱ्याच्या पावसामुळे तालुक्यातील एकूण २७ घरांवरील छपरे उडून मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याची माहिती तहसील कार्यालयात मिळाली आहे. याबाबतची माहिती मिळताच तसेच कार्याद्वारे तलाठी सर्कल मंडळ तसेच कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी





जाऊन नुकसान झालेल्या घरांची पाहणी केली आहे.

पावसामुळे वीट भट्टी वाल्यांचे देखील मोठे नुकसान झाले आहे. नुकसान झालेल्या वीट भट्टीचा पंचनामा करण्याची मागणी वीट भट्टीचे मालक दीपक धुमाळ यांनी केली आहे.

पावसामुळे मुरबाड तालुक्यात उच्च दाब वाहिनीचे जवळपास १३ विजेचे खांब व २७ लघुदाब वाहिनीचे खांब कोसळले आहेत, तसेच मोठ मोठी झाडे पडल्यामुळे ५० ते ६० ठिकाणी तारा तुटून पडल्या आहे. त्यामुळे मुरबाड तालुक्यातील जवळपास २७००० ग्राहकांचा वीज पुरवठा बाधित झालेला होता. कर्मचारी व अधिकारी यांनी रात्री भर पावसात वीज पुरवठा सुरळीत करण्यासाठी अथक परिश्रम घेऊन जवळपास २२००० ग्राहकांचा वीज पुरवठा रात्रीच सुरळीत केला. सध्या पडलेले विजेचे खांब उभे करण्यासाठी ७ कंत्राटदार, ६० कामगार, कर्मचारी व अधिकारी सतत कार्यरत असून उर्वरित ग्राहकाचा वीज पुरवठा सुरळीत करण्याचे काम सुरू आहे. बदलापूर विभागाचे महावितरण कंपनीचे कार्यकारी अभियंता आनंद काटकर यांनी ही माहिती दिली आहे. ग्रामीण भागात जवळपास २०तास वीज पुरवठा खंडित झाला होता त्यानंतर मुरबाड महावितरण कंपनीच्या टीमने सकाळी सात वाजल्यापासून सुरुवात करून युद्धपातळीवर काम केले त्यावेळी सकाळी ११ वाजता विद्युत पुरवठा सुरू झाल्याची माहिती मुरबाड महावितरण कंपनीचे प्रभारी उपअभियंता राजेंद्र शिर्के यांनी दिली आहे.

## माजी पंतप्रधान स्व. राजीव गांधी यांना आदरांजली



◆ भिवंडी (वार्ताहर) :

शासन परिपत्रक व भिवंडी महानगरपालिका माननीय प्रशासक तथा आयुक्त अनमोल सागर (भा. प्र. से.) यांच्या निर्देशानुसार दिनांक २१/५/२०२५ रोजी माजी पंतप्रधान राजीव गांधी यांचा स्मृति दिन दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवस म्हणून पाळण्यात आला असून माननीय अतिरिक्त आयुक्त विठ्ठल डाके यांच्या शुभहस्ते माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. तदनंतर अतिरिक्त आयुक्त यांनी सर्व अधिकारी समवेत दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवसाची प्रतिः घेतली. याप्रसंगी शहर अभियं जमील पटेल, सहाय्यक आयुव सामान्य प्रशासन अनुराधा बाब विभाग प्रमुख सुधीर गुरव, मिलिं पळसुले, प्रशांत संखे, दीपिका ठाव व इतर कर्मचारी वर्ग मोठ्या संख्ये उपस्थित होते.

# नवे गृहनिर्माण धोरण; सर्वंकष असावे

राज्याच्या नवीन गृहनिर्माण धोरणाला मंत्रिमंडळ बैठकीत मंगळवारी मंजुरी मिळाली. 'माझे घर-माझे अधिकार' असे या धोरणाचे सुंदर ब्रीदवाक्य आहे. सन २०३० पर्यंत ३५ लाख घरांच्या निर्मितीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. त्यासाठी ७० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक केली जाणार आहे. झोपडपट्टी पुनर्वसन ते पुनर्विकास असा सर्वांगीण कार्यक्रम यामध्ये सामावून घेण्यात आला आहे. अल्प उत्पन्नधारक, ज्येष्ठ नागरिक, महिला, औद्योगिक कामगार आणि विद्यार्थी यांच्या विशिष्ट गरजांचा या धोरणात प्राधान्याने विचार करण्यात आला आहे, असे सरकारच्या वतीने सांगण्यात आले आहे. तसे पाहायला गेल्यास राज्याचे यापूर्वीचे गृहनिर्माण धोरण सन २००७ मध्ये प्रसिद्ध झाले होते. त्यानंतर सुमारे १८ वर्षांनी हे नवे गृहनिर्माण धोरण जाहीर झाले आहे. तत्पूर्वी राष्ट्रीय गृहनिर्माण धोरणाच्या धर्तीवर राज्य शासनाने २०१६ साली प्रस्तावित गृहनिर्माण धोरण सादर केले; परंतु आजमितीपर्यंत प्रत्यक्षात शासनाला अद्याप सर्वंकष गृहनिर्माण धोरण जाहीर करता आले नव्हते. नऊ वर्षांनंतर नवे गृहनिर्माण धोरण जाहीर करण्यात प्रशासनाला यश आले आहे; परंतु मुंबईसह महाराष्ट्रातील वाढणाऱ्या शहरांचा पसारा पाहता, गृहनिर्माण धोरण हे कितपत वास्तवात उतरेल, हे येणाऱ्या काळात स्पष्ट होईल.

या नव्या धोरणात ज्येष्ठ नागरिक, नोकरदार महिला, विद्यार्थी आणि औद्योगिक कामगारांसाठी विशेष उपाययोजना प्रस्तावित केल्या आहेत. यामध्ये नोकरदार महिला, विद्यार्थी यांना भाडेतत्त्वावर आणि औद्योगिक कामगारांसाठी १० वर्षांपर्यंत भाडेतत्त्वावर त्यानंतर मालकी हक्काने घरे दिली जातील, असे आश्वासित केले आहे. तसेच शासकीय कर्मचारी, माजी सैनिक, स्वातंत्र्य सेनानी, दिव्यांग, पत्रकार, कलाकार, गिरणी व माथाडी कामगार, तसेच विमानतळ कर्मचारी यांसारख्या विशेष घटकांसाठी गृहनिर्माण योजना राबविणे प्रस्तावित आहे. तसेच मुंबईसारख्या शहरांतील प्रमुख रुग्णालयांच्या जवळ रुग्णांच्या नातेवाइकांसाठी भाडेतत्त्वावर परवडणारी घरे उपलब्ध करून देण्याकरिता गृहनिर्माण प्रकल्प राबविण्यात येणार आहे.

निवारा हा एक मूलभूत अधिकार आहे, जो भारतीय राज्यघटनेच्या कलम २१ अन्वये जीवनाच्या अधिकाराचा भाग आहे. सर्वोच्च न्यायालयाने १९९६ मध्ये चमेली सिंग विरुद्ध उत्तर प्रदेश राज्य या खटल्यात हा निर्णय दिला होता. या निर्णयानुसार, प्रत्येक नागरिकाला योग्य आणि सुरक्षित राहण्याची जागा मिळण्याचा हक्क आहे, जो मूलभूत मानवी हक्कांपैकी एक आहे. भारतीय राज्यघटनेचे कलम २१ "जीवनाचा आणि वैयक्तिक स्वातंत्र्याचा अधिकार" हमी देते. या कलमाचा अर्थ असा आहे की, प्रत्येक व्यक्तीला जीवन जगण्याचा आणि सुरक्षित राहण्याचा अधिकार आहे. तसेच निवारा हक्क म्हणजे केवळ घराचा हक्क नाही, तर सुरक्षित आणि चांगल्या परिस्थितीत राहण्याचा हक्क आहे. यामध्ये स्वच्छ पाणी, वीज आणि स्वच्छता यांसारख्या मूलभूत सुविधांचाही समावेश होतो. सर्वोच्च न्यायालयाने या हक्काला मूलभूत मानवी हक्क म्हणून मान्यता दिली आहे. या निर्णयामुळे, सरकारने लोकांना निवारा उपलब्ध करून देण्यासाठी उपाययोजना करणे आवश्यक आहे, याची तरतूद मुळात घटनेत नमूद आहे.

तरीही राज्य सरकारने गृहनिर्माण धोरणाच्या माध्यमातून 'माझे घर माझे अधिकार' या ब्रीदवाक्यातून घराचे स्वप्न साकारण्याचा घेतलेला निर्णय हा स्वागतार्ह आहे; परंतु, राज्यात या आधी गृहनिर्माण धोरणाचा कसा खेळखंडोबा झाला आहे, हे नव्याने सांगायला नको. १९९५ साली शिवशाही सरकार सत्तेवर आल्यानंतर ४० लाख झोपडपट्टीवासीयांना मोफत घरे देण्याची योजना हे त्याचे जिवंत उदाहरण आहे. आज तीस वर्षांचा काळ लोटल्यानंतर मुंबईसह ठाणे, नवी मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर ही शहरे झोपडपट्टीमुक्त झाली का?, या प्रश्नांचे उत्तर नाही, असे येईल. उलट अनेक एसआरएचे प्रकल्प रखडलेले पाहायला मिळतील. झोपडपट्टीतील रहिवाशांना राहण्याची इमारतीत घरे मिळाली असतील त्यापेक्षा जास्त संख्येने आज मुंबईत झोपडपट्टीत लोक राहत असतील, तर त्या योजनेला अर्थ काय? आता नव्या धोरणात झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पांसाठी केंद्र सरकारच्या जमिनीचा वापर प्रस्तावित केला आहे. या अंतर्गत केंद्र सरकार व झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांच्यात संयुक्त उपक्रम स्वरूपात झोपडपट्ट्यांच्या पुनर्वसनासाठीच्या योजना राबविता येऊ शकतात, असे म्हटले आहे; परंतु केंद्र सरकार, राज्य सरकार यांच्यात यापुढे समन्वय राहिला तरच योजना साकार होऊ शकतात.

"घर पाहावे बांधून आणि लग्न पाहावे करून', अशी मराठीत प्रचलित म्हण आहे. कौटुंबिक पातळीवरील ही म्हण असली तर काही अंशी सरकारलाही लागू पडते. गेल्या अनेक वर्षांपासून म्हाडाच्या संक्रमण शिबिरात हजारो कुटुंबांची एक पिढी घराचे स्वप्न पाहता पाहता मोठी झाली. कुटुंब प्रमुख असलेल्या व्यक्ती कधी स्वतःच्या हक्काच्या घरात जाईन, या आशेवर असताना, त्यांना मृत्यू आला, अशी अनेक उदाहरण देता येतील. त्यामुळे, राज्य सरकारने नवे गृहनिर्माण जाहीर केले असले तरी, त्याचा अभ्यास कितपत केला आहे. समाजातील वस्तुस्थिती काय आहे. आर्थिक बाबींचा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी किती काळजी घेतली आहे, हे यापुढील प्रकल्पाच्या विकासात कामातून अडथळे आले नाही तर कळून येईलच. मुंबईसारख्या शहराची वाढती लोकसंख्या, दिवसेंदिवस बाहेरून येणारे लोंढे या पार्श्वभूमीवर गृहनिर्माण प्रकल्प किती साकार होतात, हे पाहावे लागेल. मुंबईत जर या नव्या धोरणाची अंमलबजावणी सुरळीत झाली तर महाराष्ट्रातील शहरांमध्ये ती त्याच गतीने होईल. धोरण हे केवळ स्वप्न राहता कामा नये, सत्यात उतरणे हीच खरी धोरणाची कसोटी राहील.

# शस्त्रास्त्र उत्पादकांना युद्धांमुळे लाभले बळ



**अजय तिवारी**

जगातील मंदीसदृश स्थितीचा फटका शस्त्रास्त्र उत्पादकांना बसला आहे. जागतिक बाजारात शस्त्रास्त्र उत्पादकांची उलाढाल कमी झाली होती. गेल्या तीन वर्षांपासून युक्रेन-रशिया, इराण-इस्त्रायल आणि गाझापट्टीमध्ये संघर्ष पेटूनही शस्त्रास्त्र उत्पादनांची मागणी वाढत नव्हती. अशा स्थितीमध्ये भारत आणि पाकिस्तानमध्ये सुरू झालेल्या युद्धामुळे जागतिक शस्त्रास्त्र उत्पादक कंपन्यांच्या आशा पल्लवित झाल्या होत्या...

शस्त्रास्त्रांच्या बाजारपेठेत बरेच बदल झाले आहेत. संरक्षणशस्त्रांचे उत्पादन करणाऱ्या देशांमधील कंपन्या दलालांना हाताशी धरून आपली निर्यात वाढवत असतात. अमेरिका आणि रशिया हे शस्त्रास्त्र उत्पादनातील आणि निर्यातीतील मोठे खेळाडू होते. भारतासह अनेक देश त्यांच्याकडून शस्त्रे खरेदी करतात. अलीकडच्या काही वर्षांमध्ये भारताने 'मेक इन इंडिया'च्या माध्यमातून शस्त्रास्त्रांच्या बाबतीत स्वयंपूर्ण होण्यावर भर दिला आहे. भारताने केवळ स्वयंपूर्णतेचे उद्दिष्ट ठेवलेले नाही, तर तो आता निर्यातीच्या मार्गावर निघाला आहे. जगातील अनेक देशांना भारत शस्त्रास्त्रे पुरवायला लागला आहे. ही निर्यात २५ हजार कोटी रुपयांपर्यंत गेली आहे. दुसरीकडे, युरोपमधूनही शस्त्रास्त्रांची मागणी कमी झाली आहे. शस्त्रास्त्रांच्या बाजारपेठांमध्ये काहीशी मंदी असल्याने उत्पादक चिंतेत होते. गेल्या तीन वर्षांपासून युक्रेन-रशिया युद्ध, इराण-इस्त्रायल संघर्ष, गाझा पट्टीतील लढा सुरू असूनही शस्त्रास्त्र उत्पादनांची मागणी वाढत नव्हती. जागतिक शस्त्रास्त्र बाजारपेठेत अजूनही अमेरिका अव्वल आहे; परंतु रशियाचा वाटा मात्र घटला आहे. असे असले, तरी भारत-पाकिस्तान युद्धात रशियाची संरक्षण सामग्री ही चीन आणि अमेरिकेच्या सामग्रीपेक्षा उजवी असल्याचे सिद्ध झाले. त्याचा परिणाम आगामी शस्त्रास्त्र विक्रीवर होऊ शकतो. 'स्टॉकहोम इंटरनॅशनल पीस रिसर्च इन्स्टिट्यूट'च्या अहवालानुसार, युरोपीय 'नाटो' सदस्य अमेरिकेने पुरवलेल्या शस्त्रास्त्रांवर अवलंबित्व वाढवत आहेत. या पार्श्वभूमीवर शस्त्रास्त्रांच्या जागतिक बाजारपेठेतला सूर दखलपात्र आहे.

२०१५-१९ आणि २०२०-२४ दरम्यान युरोपीय 'नाटो' सदस्यांकडून शस्त्रास्त्रांची दुप्पट आयात झाली. अमेरिकेने या शस्त्रास्त्रांपैकी ६४ टक्के पुरवठा केला, जो २०१५-१९ च्या तुलनेत (५२ टक्के) लक्षणीयरीत्या जास्त आहे. फ्रान्स आणि दक्षिण कोरिया (प्रत्येकी ६.५ टक्के), जर्मनी (४.७ टक्के) आणि इस्रायल (३.९ टक्के) हे इतर मुख्य पुरवठादार होते. ट्रम्प यांच्या पहिल्या कार्यकाळात रशियाच्या वाढत्या आक्रमक भूमिकेमुळे आणि ट्रान्सअटलांटिक संबंधांमधील तणावामुळे युरोपीयन 'नाटो' देशांनी शस्त्रास्त्र आयातीवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी आणि युरोपीयन शस्त्रास्त्र उद्योगाला बळकटी देण्यासाठी पावले उचलली. युरोपीय 'नाटो' देशांनी अमेरिकेकडून सुमारे ५०० लढाऊ विमाने आणि इतर अनेक शस्त्रे ऑर्डर केली आहेत. गेल्या काही काळात अमेरिकेने शस्त्रास्त्र निर्यातीत आपला वाटा वाढवला, तर रशियन निर्यातीत घट झाली. २०१५-१९ आणि २०२०-२४ दरम्यान अमेरिकेची शस्त्रास्त्र निर्यात ३५ टक्क्यांवरून ४३ टक्क्यांपर्यंत वाढली. २०२०-२४ मध्ये अमेरिकेने १०७ देशांना प्रमुख शस्त्रे पुरवली.

गेल्या दोन दशकांमध्ये २०२०-२४ मध्ये पहिल्यांदाच अमेरिकेच्या शस्त्रास्त्र निर्यातीचा सर्वात मोठा वाटा मध्य पूर्वेला (३३ टक्के) न देता युरोपला (३५ टक्के) गेला. तरीही सौदी अरेबिया अमेरिकन शस्त्रास्त्रांचा सर्वात मोठा आयातदार राहिला. (अमेरिकेच्या शस्त्रास्त्र निर्यातीच्या बारा टक्के). लढाऊ विमानांसारख्या प्रगत लांब पल्ल्याच्या हल्ल्याच्या क्षमतांसाठी अमेरिका हा पसंतीचा पुरवठादार आहे. अमेरिकेच्या तुलनेत, २०१५-१९ आणि २०२०-२४ दरम्यान रशियन शस्त्रास्त्रनिर्यातीत झपाट्याने घट झाली. फेब्रुवारी २०२२ मध्ये रशियाने युक्रेनवर पूर्ण आक्रमण करण्यापूर्वी ही घसरण सुरू झाली. युक्रेनविरुद्धच्या युद्धामुळे रशियाच्या शस्त्रास्त्र निर्यातीतली घट आणखी वाढली.

२०१५-१९ आणि २०२०-२४ दरम्यान फ्रान्सने इतर युरोपीय देशांना केलेल्या प्रमुख शस्त्रास्त्रांच्या निर्यातीत जवळजवळ तिप्पट वाढ झाली. हे प्रामुख्याने ग्रीस आणि क्रोएशियाला लढाऊ विमानांचा पुरवठा आणि २०२२ मध्ये रशियाच्या पूर्ण आक्रमणानंतर युक्रेनला शस्त्रास्त्रांचा पुरवठा यामुळे घडले. युरोपियन देशांना फ्रान्समधून १५ टक्के शस्त्रास्त्रे निर्यात झाली. फ्रान्सकडून मोठ्या प्रमाणात शस्त्रास्त्रे मिळवणारा कतार हा दुसरा सर्वात मोठा देश होता. २०२०-२४ मध्ये चीन हा शस्त्रास्त्रांचा चौथा सर्वात मोठा निर्यातदार होता. जागतिक शस्त्रास्त्र निर्यातीत त्याचा वाटा ५.९ टक्के होता. चीन शस्त्रास्त्र निर्यात वाढवण्याचे प्रयत्न करत असूनही अनेक मोठे आयातदार राजकीय कारणांमुळे चिनी शस्त्रे खरेदी करत नाहीत. आशिया आणि ओशनिया हे शस्त्रास्त्र आयात करणारे सर्वात मोठे प्रदेश आहेत. २०१५-१९ आणि २०२०-२४ दरम्यान आशिया आणि ओशनियातील देशांमध्ये जाणाऱ्या जागतिक शस्त्रास्त्र हस्तांतरणाचा वाटा ४१ टक्क्यांवरून ३३ टक्क्यांपर्यंत घसरला. या प्रदेशातील आयातीत २१ टक्के घट ही मुख्यतः दोन कालावधीत चीनच्या शस्त्रास्त्र आयातीत ६४ टक्के घट झाल्यामुळे झाली. कारण त्यांनी प्रामुख्याने रशियाकडून होणाऱ्या आयातीऐवजी स्थानिक पातळीवर डिझाइन केलेल्या आणि उत्पादित शस्त्रास्त्र प्रणालींवर भिस्त ठेवली. आज चीनच्या देशांतर्गत शस्त्रास्त्र उद्योगाची क्षमता वाढत असताना त्याची शस्त्रास्त्र आयात कमी होत राहण्याची अपेक्षा आहे.

जागतिक स्तरावर शस्त्रास्त्रांच्या दहा सर्वांत मोठ्या आयातदारांमध्ये आशिया आणि ओशनियामधील चार देशांचा समावेश आहे. ते म्हणजे भारत, पाकिस्तान, जपान आणि ऑस्ट्रेलिया. १९९०-९४ नंतर पहिल्यांदाच चीन पहिल्या दहा शस्त्रास्त्र आयातदार देशांमधून बा
पडला. २०२०-२४ मध्ये अमेरिका या प्रदेशासाठी मु
पुरवठादार होता. त्यांचा प्रादेशिक शस्त्रास्त्र आयात
३७ टक्के वाटा होता. रशिया (१७ टक्के) आणि च
(१४ टक्के) असा वाटा होता. भारत हा जगातील दुस
क्रमांकाचा सर्वात मोठा शस्त्रास्त्र आयातदार होता. त्या
आयातीला चीन आणि पाकिस्तान या दोन्ही देशांक
असणाऱ्या धोक्यांचा संदर्भ होता. तथापि, २०१५-१९
२०२०-२४ दरम्यान त्याची आयात ९.३ टक्क्यांनी क
झाली. भारतीय शस्त्रास्त्र आयातीपैकी सर्वात मोठा व
(३६ टक्के) रशियाकडून आला, जो २०१५-१९ (
टक्के) आणि २०१०-१४ (७२ टक्के) पेक्षा खू
कमी आहे. २०१५-१९ आणि २०२०-२४ दरम्
पाकिस्तानकडून शस्त्रास्त्र आयात ६१ टक्क्यांनी वाढ
दरम्यान, पुरवठादार म्हणून चीन आणखी प्रबळ झा
२०२०-२४ मध्ये पाकिस्तानच्या शस्त्रास्त्र आयातीपै
८१ टक्के वाटा चीनचा होता, जो २०१५-१९ मध्ये
टक्क्यांवरून वाढला आहे. २०१५-१९ आणि २०२०-
दरम्यान पूर्व आशियाई देशांकडून शस्त्रास्त्र आयात
टक्क्यांनी कमी झाली, चीनकडून शस्त्रास्त्र आयात
मोठी घट झाली आणि तैवान (- २७ टक्के) आ
दक्षिण कोरिया (- २४ टक्के) यांच्या आयातीत लक्षण
घट झाली.

शस्त्रास्त्रांच्या आयातीमध्ये वाढ करणारा ज
(+९३ टक्के) हा एकमेव पूर्व आशियाई देश होता. यु
आणि मध्य पूर्वेला शस्त्रास्त्रांची आयात माध्यमांचे ल
वेधून घेत असताना आशिया आणि ओशनिया हे २०२
२४ मध्ये जगातील सर्वात मोठे शस्त्रास्त्र आयात कर
क्षेत्र राहिले. या प्रदेशातील बहुतेक शस्त्रास्त्र खरेदीम
चीनशी संबंधित धोक्याची धारणा आहे. मध्य पूर्वे
होणाऱ्या शस्त्रास्त्रांच्या आयातीपैकी अर्ध्याहून अधि
आयात अमेरिकेतून (५२ टक्के) झाली तर १३ ट
इटलीतून, ९.८ टक्के फ्रान्समधून आणि ७.६ ट
जर्मनीतून झाली. प्रादेशिक संघर्ष आणि तणाव म
पूर्वेमध्ये शस्त्रास्त्रांच्या आयातीची मागणी वाढवत आहे
असुरक्षित युद्ध आणि संघर्षांमुळे पश्चिम आफ्रिकेम
शस्त्रास्त्रांची आयात झपाट्याने वाढली आहे. गे
१५ वर्षांमध्ये सुरक्षा परिस्थिती बिघडल्यामुळे पश्चि
आफ्रिकेत शस्त्रास्त्रांचे हस्तांतरण झपाट्याने वाढले अ
आता भारत आणि पाकिस्तानमधील युद्धाच्या परिस्थित
जागतिक शस्त्रास्त्र पुरवठादार कंपन्यांना चांगले दि
येण्याचे स्वप्न पडायला लागले आहे.

# अवकाळीने रानमेवा रानातच...!




**माझे कोकण**



**संतोष वायंगणकर**

एप्रिल-मे महिना म्हणजे कोकणात चाकरमान्यांची लगबग... मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक आदी शहरांमध्ये नोकरी व्यवसायाच्या निमित्ताने जे बाहेर असतात असे सारे कोकणात आपल्या मूळ गावी येतात. या चाकरमान्यांच्या आगमनाने कोकणातील गावखेडी गजबजलेली असतात. कोकणातील बंद घरे चाकरमान्यांच्या वास्तव्याने महिनाभरासाठी उघडी दिसतात. तशी गावातील वाडी-वस्तीतही लोकांची ये-जा सुरू असते. एप्रिल-मे महिना लग्न सोहळे, गावातील ग्रामदेवतांचे वर्धापन दिन, गावचे उत्सव, कोकणातील ग्रामदेवतांच्या मंदिरातील महाप्रसाद असं सारं उत्सवी वातावरण असतं. कडक उन्हाळ्यातही ग्रामदेवतेच्या उत्सवात प्रत्येक गावकरी आपल्या कुटुंबासह सहभागी असतो. कडक उन्हाळा, काही गावातून जाणवणारी पाणीटंचाई असं सगळं वातावरण असलं तरीही कोकणवासीय मात्र आपला आनंद मित्रपरिवार, नातेवाईक यांच्या विवाह सोहळ्यात, वास्तुशांतीच्या कार्यक्रमातून शोधत असतो. त्यात कोकण रमलेलं असतं. आंबा, काजू, कोकम, करवंद, जांभुळ कोकणात येणाऱ्या चाकरमान्यांच्या स्वागतास तयार असतात; परंतु यावर्षी आंबा, काजू यांच पीक कमी झालं. काजू 'बी' चा दर सर्वसाधारणपणे स्थिर राहिला; परंतु हवामानाच्या सततच्या परिणामाने पिकावर आणि उत्पादित झालेल्या काजू 'बी'वर त्याचा परिणाम झाला. काजू 'बी'वर काळपट थर जमा झाला. साहजिकच काजू बागायतदार शेतकऱ्यांची मेहनत वाढली. काजू 'बी' साफसफाई केल्याशिवाय विक्रीला देता येणारी नव्हती. आंब्याची स्थिती यापेक्षा वेगळी नव्हती. सुरुवातीला हापूस आंब्याचा दर चांगला होता; परंतु बदलत राहणारे हवामान आणि अवकाळी पाऊस यामुळे साहजिकच आंबा शेवटच्या टप्प्यात आंबा बागायतदार शेतकऱ्याच्या हातून निसटला. एकतर यावर्षी आंबा उत्पादनही फारच कमी प्रमाणात झाले. कोकणातील स्थानिक बाजारपेठातून कोकणातील हापूस आंबा गायब झाला आहे. कोकणातील आंबा बागायतदार शेतकऱ्याकडे आंबाच नाही. त्यामुळे बाजारपेठामध्ये कोकणाबाहेरचा आंबा विक्रीला दिसत आहे. कोकणात भरणारा आठवडा बाजार आणि गावठी बाजारात कोकणातील झाडी आंबा येऊ लागला आहे. मात्र, कोकणात रायवळ आंब्याची जुनी झाडही गावातून दुर्मीळ होत आहेत. यामुळे कोकणात पूर्वी गोरगरीब कुटुंबांना मे महिन्यात आधार वाटणारा रायवळ आंबा दिसेनासा झाला आहे. पूर्वीची आंब्याची झाड जपली जात नाहीत आणि नव्याने कोणीही रायवळ आंब्याची लागवडही करत नाही. यामुळे साहजिकच कोकणच वैशिष्ट्यपूर्ण असलेला रायवळ आंबा अस्तित्वहीन होत चालला आहे.

कोकम हे कोकणच आणखी एक खास वैशिष्ट्य आहे. कोकमची सोलकढी आज अगदी महाराष्ट्रातच नव्हे तर जगाच्या बाजारपेठेतही मानाने जेवणाच्या ताटात मिरवताना दिसते. कोकमला यावर्षी दरही चांगला होता; परंतु कोकमच उत्पादनही कमी आहे. कोकमला मेहनत आहे. आता कोकणात इतकी मेहनत करून कोकणातील या कोकमच विविध प्रकार करण्यात पुरेस मनुष्यबळही उरलेले नाही. दुसरी गोष्ट कोकणात कोकम लागवड ज्याला फार कमी मेहनत असते. ती कोकम लागवड व्हायला हवी होती. परंतु ती लागवड म्हणावी त्या प्रमाणात झाली नाही. कोकम लागवड मोठ्या प्रमाणात कोकणात झाली असती तर त्याचा फायदाही कोकणातील शेतकऱ्याला होऊ शकला असता. परंतु यातही काही भागात मात्र शेतकऱ्यांनी कोकमची स्वतंत्र बागायत केल्याचे सकारात्मक दृश्यही पाहायला मिळतं. याचं प्रमाण फार कमी असलं तरीही कोकणातील काही मोजक्या शेतकऱ्यांनी प्रायोगिकतेत प्रयत्न तर केले आहेत. जांभुळ यावर्षीही कोकणच्या बाजारात फार कुठे दिसले नाही. कोकणातील जांभुळ पुणे, मुंबईच्या बाजारात पाठवले जाते. त्याला मागणीही मोठ्या प्रमाणात आहे; परंतु जांभुळ लागवडीच्या बाबतीतही कोकणात उदासीनताच पाहायला मिळते. जांभुळ लागवड करून त्याचा बागायत म्हणून आजवर कोणी फारसा विचार केलेला नाही. दुसरी बाब जांभुळ, करवंद याबाबतीत कोकणकृषी विद्यापीठ आजही उदासीनच आहे. यामुळेच जांभुळ, करवंदांकडे कृषी विद्यापीठाने त्याकडे आपलं लक्ष वळवलेलं नाही. कोकणची काळी मैना म्हणून या करवंदांचा उल्लेख सर्वत्र होतो. कोकणातील ही करवंद डोंगर-दऱ्यांमध्ये असतात. रानात दिसणारी ही करवंद पूर्वी बाजारात विक्रीला यायची. कोकणात येणारा चाकरमानीही शेताच्या बांधावर काटेरी झुडपात होणारी करवंद सहकुटुंब या करवंदाचा आस्वाद घ्यायचा, चांदवड्याच्या पानाचा तयार केलेला खोला. त्यात आपण स्वतः करवंदांच्या झाळीवरून काढलेली करवंद ती खाण्यात एक वेगळीच मजा असते. हा आनंद ज्यांनी अनुभवला असेल निश्चितच नुसत्या कल्पनेनेही त्यांना ते जुने दिवस आठवल्यावाचून राहणार नाहीत. यावर्षी या अशा सर्व आनंदावर विरजणच पडले आहे.

कोकणात पाऊस सुरू झाला. सुरुवातीला हा पाऊस एकच दिवस वाटला; परंतु तसे घडले नाही. तो रोज संध्याकाळी, सकाळीही पाऊस पडू लागला. यामुळे साहजिकच कोकणातील रानमेवा लोकांपर्यंत पोहोचण्यापूर्वी रानातच राहिला. यामुळे जशी जांभुळ, करवंद लोकांना त्याची फारशी चव चाखायलाही मिळाली नाही. यामुळे यावर्षी अवकाळी पावसाने कोकणात उत्पादित होणाऱ्या सर्वच फळांच्या बाबतीत काहीशी अशीच स्थिती आहे. फणसाचं उत्पादन यावर्षी चांगलं झालंय. यामुळे कोकणातील मुंबई-गोवा महामार्गावर कोकणातील फणस विक्रीला असलेला दिसतो. कापे आणि रसाळ या दोन प्रकारात असणाऱ्या फणसांना दोन्ही प्रकारात फार मोठी मागणी आहे. मात्र, यातही कापा फणस बाजारात फार मोठ्या प्रमाणात विक्रीला असतो. याचं एक सहज आठवलेलं उदाहरणही सांगतो. सिंधुदुर्गात २००९ मध्ये राज्य मंत्रिमंडळाची बैठक होती. या राज्य मंत्रिमंडळ बैठकीला सर्व मंत्रीगण उपस्थित होते. त्यावेळच्या मंत्रिमंडळ बैठकीसाठी राज्याचे विद्यमान उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजितदादा पवार उपस्थित होते. तेव्हा अजितदादा पवार राज्याचे अर्थमंत्री होते. त्यावेळच्या जेवणामध्ये स्वीट डीश म्हणून कापे गरे होते. अजितदादांनी कापे गऱ्याची तेव्हा खास फर्माइश केली. अगदी कापे गरे पॅकिंगमधूनच मागितले होते. त्यामुळे कोकणातील या काप्या गऱ्यांची स्वादिष्टताही वेगळीच आहे. कोकणातील हे सारं निसर्ग निर्मित फळ यावर्षी पावसाने मात्र त्याचा स्वाद तर बिघडलाच; परंतु लोकांपर्यंत येण्यापूर्वीच रानातच राहिला.

## राशिभविष्य

गुरुवार, २२ मे २०२५

### ॥ पंचांग ॥

आज मिती वैशाख कृष्ण दशमी शके १९४७, चंद्र नक्षत्र पूर्वाभाद्रपदा, योग विष्कांभ, चंद्र राशी कुंभ भारतीय सौर १, ज्येष्ठ शके १९४७, म्हणजेच गुरुवार दिनांक २२ मे २०२५, मुंबईचा सूर्योदय ०६.०१, मुंबईचा सूर्यास्त ०७.०८, मुंबईचा चंद्रोदय ०२.४१, उद्या मुंबईचा चंद्रास्त ०२.१६, राहू काळ ०२.१३ ते ०३.५१, जर्थोस्तंनो दिसो, शुभ दिवस- दुपारी-०२;२१ पर्यन्त.

### ॥ भविष्य ॥

**मेष** : अडचणी दूर होणार आहेत.

**वृषभ** : अनुकूल घटना घडतील.

**मिथुन** : आर्थिक प्राप्ती होणार आहे

**कर्क** : सहकार्य चांगले मिळणार आहे.

**सिंह** : धोका स्वीकारू नका.

**कन्या** : कामे मनासारखी होतील.

**तूळ** : कामे मार्गी लागणार आहेत.

**वृश्चिक** : दिवस मनासारखा जाणार आहे.

**धनू** : जबाबदाऱ्या स्वीकाराव्या लागतील.

**मकर** : अनेकांचे सहकार्य मिळणार आहे.

**कुंभ** : जास्त काम करावे लागण्याची शक्यता.

**मीन** : आनंदी वातावरण असणार आहे.

## जनसंवाद

### भारत धर्मशाळा नाही

भारत देश म्हणजे धर्मशाळा नाही की जिथे आम्ही जगातून आलेल्या परदेशी नागरिकांना राहायला जागा देऊ अशी कठोर टिप्पणी नुकतीच सर्वोच्च न्यायालयाने केली असल्याचे वृत्त आहे ते निश्चितच स्वागतार्ह म्हणावे लागेल. श्रीलंकेतील एका नागरिकाने सुप्रीम कोर्टात आश्रय याचिका दाखल केली होती. ही याचिका सुप्रीम कोर्टाने फेटाळून लावली. न्या. दीपांकर दत्ता आणि न्या. के. विनोद चंद्रन यांच्या खंडपीठाने श्रीलंकन नागरिकाच्या याचिकेवर सुनावणी घेतली. या नागरिकाला २०१५ साली लिबरेशन टायगर्स ऑफ तामिळ इलमशी जोडल्याच्या आरोपावरून अटक केली होती. त्याला यूएपीए प्रकरणी दोषी ठरवले होते. त्याला श्रीलंकेत मारण्याची भीती आहे. त्यामुळे त्याला भारतातच राहायचे होते. त्यासाठी त्याने याचिका दाखल केली होती. शरणार्थींना राहण्यास परवानगी देण्यासाठी भारत देश काय धर्मशाळा आहे? असा सवालही सर्वोच्च न्यायालयाने केला आहे. जगभरातील निर्वासितांना भारतात स्थान देणे शक्य आहे का, आपण १४० कोटी लोक इथे अनेक अडचणींना तोंड देतो. भारत एखादी धर्मशाळा नाही, असे न्यायालयाने म्हटले. एवढेच नव्हे तर असून याचिकाकर्त्याच्या अटकेबाबतच्या प्रकरणात कोणताही हस्तक्षेप करण्यास नकार दिला आहे. बाहेरील देशांतील लोक काय करतील याचा नेम नाही त्यामुळे हा निर्णय योग्यचं आहे.

**- राजू जाधव,** मांगूर, जि. बेळगाव

### नाट्यनिर्माता संघांने पाठपुरावा करावा

'नाट्यप्रयोग उशिरा संपल्यास दंड' महापालिकेच्या नव्या नियमांमुळे नाट्य निर्माते नाराज असल्याची बातमी नुकतीच वाचनात आली. नाट्यगृहांतील नाटकाचे प्रयोग उशिरा संपल्यास प्रती अर्धा तास एक हजार रुपये दंड आकारण्याचा निर्णय मुंबई महापालिकेने घेतला आहे. आता याच आदेशाचे अनुकरण ठाणे, कल्याण, डोंबिवली, तसेच नवी मुंबई व इतर ठिकाणच्या नाट्यगृहांबाबतही घेतले जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. नाट्यनिर्मात्यांना दंड लावण्याबाबत जागरूक असणारे प्रशासन नाट्यगृहांच्या सोयीसुविधांबाबत तितक्याच सफाईने दुर्लक्ष करताना दिसतात, याचा अनुभव अलीकडेच डोंबिवली येथे 'थेट तुमच्या घरातून' या नाट्यप्रयोगाच्या वेळी आला. नाटक ऐन रंगात आले असताना किमान चार वेळा रंगमंचावर प्रत्येकी पाच ते सात मिनिटांचा ब्लॅक रसिक प्रेक्षकांचा हिरमोड झाला होता. दरम्यान प्रसाद खांडेकरांचा 'हे दोन आठवड्यांपूर्वी करायला हवं होतं' हा पंच काळोखातही जोरदार टाळ्यांनी वाजला. या दरम्यान नाटक अर्धा तास उशिराने संपले. अशा परिस्थितीची सर्व जबाबदारी स्वीकारून महापालिका प्रशासनाने नाट्यगृहांच्या भाड्यामधील काही अंशी रकमेचा परतावा निर्मात्यांना मिळेल, याबाबतचा आदेशही त्वरित पारित करावा. नाट्यनिर्माता संघाने यांचा शासन दरबारी पाठपुरावा करण्याची हीच योग्य वेळ आहे.

**- विजयकुमार अणावकर,** डोंबिवली (पूर्व)

### शिष्टमंडळाची गरज काय?

'ऑपरेशन सिंदूर'बाबत परदेशात जाऊन भारताची बाजू मांडण्यासाठी केंद्र सरकारने ५९ जणांच्या शिष्टमंडळाची घोषणा केली आहे. जगातील महत्त्वाच्या देशांना भेटी देऊन तिथे 'ऑपरेशन सिंदूर' आणि पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादाबद्दल भारताची भूमिका मांडण्यात येणार आहे. जगाला 'ऑपरेशन सिंदर'बद्दल माहिती मिळाली नाही का? त्यांचा विश्वास बसणार आहे. शिष्टमंडळाच्या भेटीनंतर सर्व देश दहशतवादाला विरोध करू लागतील का? शिष्टमंडळात सर्वपक्षीय खासदारांचा समावेश केल्याने कोणाताच पक्ष या शिष्टमंडळाला विरोध करणार नाही. शिष्टमंडळाच्या परदेश दौऱ्याचा खर्च कोण करणार? शिष्टमंडळाचा पदरेश दौरा न करता त्या देशाच्या प्रतिनिधींशी ऑनलाईन संपर्क करून, चर्चा करून आपली बाजू मांडता आली असती. आपले पंतप्रधान नेहमीच इतर देशांच्या राष्ट्रप्रमुखांशी संपर्क करून, चर्चा करून माहिती देत असताना या शिष्टमंडळाची गरज नव्हती. 'ऑपरेशन सिंदूर'ला बऱ्याच देशांनी पाठिंबा दिला. 'ऑपरेशन सिंदूर'ला विरोध झाला नाही याचाच अर्थ जगातील देशांना भारताने दहशतवादाच्या विरोधात केलेली कारवाई मान्य आहे.

**- विवेक तवटे,** कळवा, ठाणे

### शिष्टमंडळाने संधीचे सोने करावे

ऑपरेशन सिंदूर आणि भारत आणि पाकिस्तानमधील संघर्षाबद्दल प्रमुख विदेशी देशाच्या सरकारांना माहिती देण्यासाठी केंद्र सरकारने सात सर्वपक्षीय खासदारांचाही समावेश आहे. केंद्र सरकारने भारताच्या राजनैतिक संपर्काचा भाग म्हणून शिष्टमंडळाचे नेतृत्व करणाऱ्या खासदारांची नावे जाहीर केली. या शिष्टमंडळाचे उद्दिष्ट भारताच्या मित्र राष्ट्रांमध्ये आणि संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेत सदस्य असलेल्या देशांमध्ये भारताची भूमिका स्पष्ट करतील. यानिमित्ताने भारतात राजकारण सुरू झाले आहे. या शिष्टमंडळात नेते म्हणून ज्या नेत्यांची निवड करण्यात आली आहे त्यावरून वाद सुरू झाला आहे. विशेषतः काँग्रेस पक्षाचे खासदार शशी थरूर यांच्या निवडीवरून काँग्रेस पक्षात दोन गट पडले आहेत. भाजपाने थरूर यांची निवड करून काँग्रेसवर मात केली. हा देशाच्या एकात्मतेचा प्रश्न आहे, त्यात अशा प्रकारचे राजकारण योग्य नाही. राष्ट्रीय सुरक्षेच्या संदर्भात भारताने एकत्रित आणि विश्वासार्ह छाप पाडणे गरजेचे आहे. त्यासाठी केंद्र सरकारने सर्व पक्षांच्या खासदारांना या मोहिमेत सहभागी करून घेतले हे महत्त्वाचे असले तरी शिष्टमंडळ सर्वपक्षीय, सर्वसमावेशक आणि पारदर्शक असणे आवश्यक आहे. तेव्हा भविष्यात कुठेही सर्वपक्षीय शिष्टमंडळ पाठवताना प्रथम खुलेपणाने संवाद साधावा. तसेच पाकिस्तानातील दहशतवादा विरोधातील ऑपरेशन सिंदर नंतर जाणाऱ्या शिष्टमंडळाने भारताची बाजू एकजुट
मांडून संधीचे सोने करावे.

**- सुनील कुवरे,** शिव

### राजशिष्टाचारापेक्षा गुलामगिरी श्रेष्ठ...

राज्यातील अधिकारी राजशिष्टाचार पाळत न
असे सरन्यायाधीश यांनी राज्याचे मुख्य सचि
पोलीस महासंचालक आणि मुंबईचे पोलीस आयु
यांच्यासारख्या उच्चपदावर विराजमान झाले
अधिकाऱ्यांना एकमेकांविषयी आदर असाय
हवा, हे सांगण्याची वेळ येते. सरन्यायाधीश ग
साहेबांनी जणू काही लोकांच्या मनातील भाव
व्यक्त केली. आज फक्त सत्ताधाऱ्यांसमोर
पुढे करणे, त्यांच्या चुकीच्या गोष्टींना पाठबळ दे
यातच उच्चपदापासून खालपर्यंत हेच धोरण अ
याउलट मुख्यमंत्री सोडा पण एखादा साधा म
येत असेल तर बकाल शहराची अशी साफसफ
करण्यापासून वरपासून खालपर्यंतचा पोलि
फौजफाटा कंबर कसून कामाला लागतो. थोडक्य
देशाच्या सर्वोच्च पदावरील सरन्यायाधीश य
स्वतःच्याच राज्यात स्वतःच्या सत्कार समारंभ
असे निराशापूर्ण वक्तव्य करावे लागते हे आपल
देशवासीयांचे दुर्दैव!

# योनी व गर्भाशय घसरण

(Vaginal Uterine Prolapse)



स्त्री आरोग्य
डॉ. स्नेहल पाटील

गर्भाशय घसरण, ज्याला वैद्यकीय भाषेत "यूटेरिन प्रोलॅप्स" (Uterine Prolapse) असे म्हणतात, ही स्त्रियांमध्ये आढळणारी एक सामान्य पण दुर्लक्षित समस्या आहे. अनेक वेळा स्त्रिया लाज किंवा भीतीमुळे याची योग्य वेळी माहिती देत नाहीत, परिणामी त्रास अधिक वाढतो. एक स्त्रीरोगतज्ज्ञ म्हणून मी यावर जागरूकता वाढवण्याचा प्रयत्न करते. या लेखामध्ये आपण गर्भाशय प्रोलॅप्सची कारणे, लक्षणे, निदान, उपचार व प्रतिबंधात्मक उपाय यांचा सविस्तर आढावा घेणार आहोत.

**गर्भाशय प्रोलॅप्स म्हणजे काय?**

गर्भाशय प्रोलॅप्स म्हणजे गर्भाशय (uterus) हे त्याच्या नैसर्गिक स्थितीतून खाली सरकून योनीमार्गात (vagina) येणे. हे सरकणे सौम्य, मध्यम किंवा तीव्र स्वरूपाचे असू शकते. काही गंभीर प्रकरणांमध्ये गर्भाशय पूर्णपणे योनीच्या बाहेर येतो, याला "पूर्ण प्रोलॅप्स" (complete prolapse) म्हणतात.

**गर्भाशय प्रोलॅप्सची कारणे**

गर्भाशयास योग्य ठिकाणी धरून ठेवणाऱ्या स्नायू व लिगामेंट्स जर कमकुवत झाल्या, तर ही समस्या उद्भवू शकते. हे कमकुवतपण विविध कारणांमुळे होऊ शकतेः

१. Complicated or multiple child-births-वारंवार होणारी व अवधी प्रसूती हे प्रमुख कारण असते.

२. वाढलेले वय आणि रजोनिवृत्ती (Menopause)-इस्ट्रोजेनच्या पातळीत घट झाल्यामुळे स्नायू कमजोर होतात.

३. गर्भावस्थेदरम्यानचा अति ताण

४. जास्त वजन उचलणे, दीर्घकाळ खोकला किंवा बद्धकोष्ठता

५. जास्त वजन (Obesity)


**लक्षणे**

गर्भाशय प्रोलॅप्सची लक्षणे तीव्रतेवर अवलंबून असतात. सौम्य प्रोलॅप्समध्ये कोणतीही लक्षणे दिसू नयेत, पण तीव्र स्वरूपात खालीलप्रमाणे त्रास होऊ शकतोः

- योनीत जडपणा किंवा दाब जाणवणे
- योनीतून काहीतरी बाहेर येतेय अशी जाणीव
- लघवी करताना अडथळा, जळजळ किंवा वारंवार लघवी होणे
- लैंगिक संबंधात वेदना
- पाठदुखी, कंबरदुखी
- चालताना किंवा उभे राहिल्यावर त्रास वाढणे

**निदान**

रोगनिदान मुख्यतः वैद्यकीय तपासणीवर आधारित असते. एक साधी पेल्विक चाचणी (pelvic examination) यामध्ये खूप उपयुक्त ठरते. काही वेळा अधिक सखोल माहितीसाठी अल्ट्रासोनोग्राफी किंवा MRI चाचण्या वापरल्या जातात.




**उपचार**

उपचार पद्धती प्रोलॅप्सच्या टप्प्यावर (degree of prolapse), रुग्णाच्या वयावर, भविष्यातील गर्भधारणेच्या इच्छेवर व एकूण आरोग्यावर आधारित असतात.

१. औषधोपचार व व्यायामः

- सौम्य प्रोलॅप्ससाठी "किगेल्स व्यायाम" (Kegel exercises) अतिशय उपयुक्त असतो. हे व्यायाम पेल्विक स्नायूंना बळकट करतात.
- काही वेळा इस्ट्रोजेन क्रीम्स वापरून योनीतील ऊतक बळकट केले जातात.

२. पेसरी (Pessary):

- योनीमध्ये घालण्याजोगे एक उपकरण जे गर्भाशयाला योग्य ठिकाणी धरून ठेवते.
- ही शस्त्रक्रियेचा पर्याय असू शकतो, विशेषतः वयोवृद्ध स्त्रियांसाठी.

३. शस्त्रक्रिया (Surgery):

- गंभीर प्रोलॅप्समध्ये शस्त्रक्रिया हाच एकमेव पर्याय उरतो.
- यामध्ये "हिस्टेरेक्टॉमी" (गर्भाशय काढून टाकणे) केली जाऊ शकते.
- नवीन तंत्रज्ञानानुसार काही शस्त्रक्रिया योनीमार्गातून किंवा लेप्रोस्कोपिक पद्धतीने केल्या जातात.

**प्रतिबंधक उपाय**

- नियमित पेल्विक फ्लोअर व्यायाम
- प्रसूतीदरम्यान काळजीपूर्वक आणि सुरक्षित वातावरण
- दीर्घकाळ बद्धकोष्ठता टाळणे
- सतत वजन उचलणे टाळणे
- आहारामध्ये फायबर आणि पाणी पुरेसे घेणे
- वयोमानानुसार नियमित तपासणी

**निष्कर्ष**

गर्भाशय प्रोलॅप्स ही एक शारीरिक त्रासदायक आणि मानसिकदृष्ट्याही क्लेशदायक अवस्था असू शकते. मात्र याबाबत लाज न बाळगता योग्य वेळी स्त्रीरोगतज्ज्ञांचा सल्ला घेणे हेच सर्वात महत्त्वाचे आहे. योग्य उपचार, आहार, व्यायाम आणि मानसिक तयारी यामुळे अनेक स्त्रिया यावर यशस्वीरित्या मात करू शकतात. आपल्या शरीराची काळजी घेणे हे आपले कर्तव्यच आहे, आणि त्यात कोणतीही लाज वाटण्याचे कारण नाही.

drsnehalspatil@gmail.com

# 'या' फळांच्या साली चेहऱ्याला ठेवतील टवटवीत!



सौंदर्य तुझं
प्राची शिरकर

आपण आजारी पडल्यावर आपल्याला फळे खाण्याचा सल्ला दिला जातो. आपण आपल्या आवडीची फळे खातो देखील पण फळे खाल्ल्यानंतर आपण अनेकदा त्याची साल कचऱ्याच्या डब्यात फेकून देतो. मात्र तुम्हाला हे माहिती आहे का की फळं तुमच्या आरोग्यासाठी आणि त्वचेसाठी जितकी फायदेशीर आहेत तितकीच त्यांची साल देखील फायदेशीर आहे. ज्याचा वापर करून तुम्ही तुमच्या चेहऱ्याचे सौंदर्य वाढवू शकता.

उन्हाळ्यात सूर्यप्रकाश, धूळ आणि प्रदूषणामुळे त्वचेवर टॅनिंग, सनबर्न, डलनेस यासारख्या अनेक समस्या उद्भवतात. त्यामुळे, तुम्ही बाजारातून केमिकलयुक्त उत्पादने खरेदी करणे, तर



थांबवालच पण सोबतच तुमच्या त्वचेवर या केमिकल्समुळे होणाऱ्या दुष्परिणामांपासूनही तुम्हाला आराम मिळेल. प्रत्येक महिलेला चमकदार आणि डागरहित त्वचा हवी असते आणि त्यासाठी बहुतेक महिला महागड्या सौंदर्यप्रसाधनांचा वापर करतात. पण, जर आम्ही तुम्हाला सांगितले की अशा समस्या फक्त काही नैसर्गिक वस्तूंनी सोडवता येतात तर? बरं, हा लेख स्वयंपाकघरातील घटकांसह त्वचेची काळजी घेण्यासाठी टिप्सबद्दल नाही, तर काही सोप्या फळांच्या सालींच्या मदतीने चमकदार त्वचा मिळविण्याबद्दल आहे. ही साले तुमच्या त्वचेसाठी खूप फायदेशीर मानली जातात आणि चेहऱ्यावर त्वरित चमक आणू शकतात. चला तर मग जाणून घेऊया या लेखातून अशी कोणती फळे आहेत ज्यांच्या साली आपण स्किन केअर रूटीनमध्ये समाविष्ट करू शकतो.

## संत्र्याच्या सालीची कमाल



संत्र्यामध्ये व्हिटॅमिन सी आणि नैसर्गिक तेल भरपूर प्रमाणात असते, जे एक चांगले एक्सफोलिएटर मानले जाते. जेव्हा तुम्ही संत्र्याच्या सालीचा वापर करता तेव्हा ते मुरुमे, काळे डाग कमी करण्यास मदत करते आणि कोलेजन तयार होण्यास मदत करते. यासाठी, सर्वप्रथम संत्र्याची साल वाळवा आणि त्याची पेस्ट बनवा, त्यात दही घाला, त्यात २ चमचे कोरफडीचे जेल आणि लिंबाचा रस घाला. मग ही पेस्ट चेहऱ्यावर १५ ते २० मिनिटे लावून चेहरा धुवून टाका.

## पपईची साल देईल चमकदार त्वचा



पपईची साल उन्हात वाळवून त्याची पावडर बनवा, नंतर त्यात मध आणि लिंबाचा रस मिसळून फेसपॅक बनवा. आता ते १५-२० मिनिटे चेहऱ्यावर लावा आणि नंतर कोमट पाण्याने चेहरा धुवा. कारण पपईच्या सालीमध्ये पपेन नावाचे एंजाइम असते, जे टॅनिंग कमी करण्यास मदत करते. पिंपल्स घालवण्यास मदत करते, त्वचेला उजळ बनवते आणि तिला मऊ देखील करते. काळे डाग कमी करण्यासाठी तुम्ही आठवड्यातून २-३ वेळा ते वापरू शकता.

## डाळिंबाची साल आहे त्वचेसाठी वरदान



डाळिंबाच्या सालीचा फेसपॅक म्हणून वापर करण्यासाठी, साली उन्हात वाळवा आणि मिक्सरमध्ये बारीक करून त्याची पावडर बनवा आणि गुलाब पाण्यात मिसळा आणि चेहऱ्याला १० मिनिटे लावा. तुमची त्वचा चमकदार आणि सॉफ्ट होईल.

## किवीची साल चेहऱ्याला ठेवेल टवटवीत



अँटीऑक्सिडंट्स आणि 'व्हिटॅमिन सी'ने समृद्ध असलेल्या किवीचे साल तुमच्या त्वचेची चमक वाढवू शकते. ते वापरण्यासाठी, किवीची साल तुम्ही चेहऱ्याला लावून मसाज करू शकता किंवा किवीच्या सालीची पेस्ट बनवा त्यात एक चमचा दही मिसळा. हे मिश्रण डोळ्यांना टाळून तुमच्या चेहऱ्यावर लावा आणि १५ मिनिटे तसेच राहू द्या. किवीमधील नैसर्गिक आम्ल मृत त्वचेच्या पेशी काढून टाकतात, रंग उजळवतात आणि निरोगी चमक देतात. ताजेतवाने, चमकदार त्वचा दिसण्यासाठी कोमट पाण्याने हळूवारपणे धुवा.

## केळीची साल उजळवेल त्वचा



केळीच्या सालीच्या पांढऱ्या तंतूंमध्ये कोरफडीचे जेल मिसळा आणि ते डोळ्यांखाली लावा, यामुळे डार्क सर्कलच्या समस्येपासून आराम मिळतो किंवा केळीच्या सालीवर थोडी हळद आणि मध घ्या आणि चेहऱ्यावर लावून मसाज करा. १५-२० मिनिटे तसेच ठेऊन नंतर चेहरा धुवा. केळीच्या सालीमध्ये अँटीऑक्सिडंट्स आढळतात जे डाग कमी करण्यास मदत करतात आणि सूज, मुरुम, जळजळ इत्यादी त्वचेच्या समस्या कमी करतात.

# सेवाव्रती डॉक्टर



अंजली गांगल



कर्तृत्ववान ती राज्ञी
वैशाली गायकवाड

महिलांच्या मानसिक आणि शारीरिक आरोग्यासाठी समर्पित भावनेने कार्य करणाऱ्या, हजारो महिलांना आरोग्यदायक सकारात्मक दृष्टिकोन देऊन नैराश्याच्या गर्तेतून बाहेर काढत आशेचे सोनेरी किरण दाखवणाऱ्या, एक उत्कृष्ट ऑक्युपेशनल थेरपिस्ट, फिजिओथेरपिस्ट आणि योग तज्ञ, समाजकार्यासाठी अविरत वाहून घेतलेल्या "सेवाव्रती" डॉक्टर अंजली शरद गांगल यांच्या प्रेरणादायी जीवन प्रवासाबद्दल आज आपण जाणून घेणार आहोत.

उत्तम नेतृत्व गुण, निर्भिडता, स्पष्टवक्तेपणा, जबाबदारी या सगळ्या संस्काराचे बाळकडू घरातूनच मिळालेल्या अंजलीताईंनी मेडिकल क्षेत्रातच करिअर करण्याचा निर्णय घेतला. शाळेत असताना अभ्यासासोबत बॅडमिंटन आणि चित्रकला यात देखील त्यांनी त्यांची चुणूक दाखवली. गिरगावातील शाळेतच बेस्ट स्टुडन्ट ऑफ स्कूल हा पुरस्कार स्वीकारताना त्यांच्या मनात योग साधनेचे बीज रोवले गेले

योग थेरपीमध्ये मुंबई विद्यापीठातून प्रगत डिप्लोमा, कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक येथून M.A. (योगशास्त्र)ची पदवी देखील संपादन केली.

महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण होताच सामाजिक कार्यातील उल्लेखनीय कामगिरीमुळे त्यांचे लग्न सामाजिक कार्याचे व दानाचे महत्त्व जाणणारे, उच्च विद्याविभूषित ह्यूमन रिसोर्स डेव्हलपमेंट मधील तज्ज्ञ शरद गांगल (आत्ता ठाणे जनता सहकारी बँकेचे अध्यक्ष आहेत) यांच्याशी झाले. लग्नानंतर त्यांच्या शैक्षणिक प्रगतीत आणि सामाजिक कार्याच्या वाटचालीत मुलांच्या संगोपनात शरदजींसोबतच मोठे दीर, जाऊ, सासू-सासरे एकत्र कुटुंब पद्धती या सगळ्या सपोर्ट सिस्टीमने महत्त्वाची भूमिका बजावली.

पाश्चिमात्य देशांकडून आलेलं आधुनिक विज्ञान-तंत्रज्ञान आणि पौर्वात्य म्हणजे भारतातील योग-अध्यात्म हे भारतीय समाजाच्या उद्धारासाठी एकत्रित आचरणात आणले पाहिजेत, हा विवेकानंदांचा विचार हृदयात खोलवर रुजला. त्यातूनच रुग्णांसाठी फिजिओथेरपी, ऑक्युपेशनल थेरपी आणि योग थेरपी या तीनही शास्त्रांचा एकत्रित वापर करून समग्र उपचार पद्धतीचा अवलंब रुग्णांसाठी केला. त्याचा रुग्णांना सांधेदुखीच्या उपचारांमध्ये अतिशय उपयोग झाला. त्यांचे सर्वात मोठे कार्य हे ठाण्यातील महिलांसाठी एकत्रित योग आणि फिजिओथेरपीचे विशेष वर्ग आयोजित करण्याचे आहे.

गेली १५ वर्षे, डॉ. अंजली ताईंनी ३५०० हून अधिक महिलांना योग व फिजिओथेरपीच्या सहकार्याने शारीरिक आणि मानसिक आरोग्य सुधारण्यासाठी मार्गदर्शन केले आहे. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेत सात वर्षे सक्रिय कार्यकर्ता म्हणून कार्य केले. १९८३ ते १९८६ पर्यंत त्यांनी कोल्हापूर येथे अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे पूर्णवेळ कार्यकर्ता म्हणून कार्य केले. २००३ पासून, ठाणे येथील घंटाळी मित्र मंडळात त्यांनी योग विभागात स्वयंसेवी सेवेस प्रारंभ केला.

तरुण वयातच अभाविपमध्ये काम करताना मनामध्ये रुजलेला सामाजिक बांधिलकीचा वारसा आयुष्याच्या प्रत्येक वळणावर जपत असताना, दहा वर्षे त्यांनी तळागाळातील गरजू विद्यार्थ्यांसाठी काम करणाऱ्या सेवा सहयोग फाऊंडेशन या संस्थेच्या कार्यास स्वतःला वाहून घेतले. या संस्थेमार्फत आर्थिकदृष्ट्या वंचित असलेल्या वस्त्यांमध्ये वाढणाऱ्या मुलांना हसत खेळत शिक्षण देण्यासाठी अभ्यासिका चालवणे, त्यांना शिक्षण उपयोगी सामुग्री उपलब्ध करून देण्याचे कार्य केले.

आजच्या घडीला ठाण्यातील तीन पेट्रोल पंप येथील विद्या भवन वसतिगृहातील ५० मुलांच्या आवश्यक त्या शैक्षणिक गरजा पूर्ण करण्यासाठी त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी आणि अभिनव क्रियाशीलतेतून त्यांना समाजात आत्मविश्वासाने उभे करण्यास सहाय्यभूत होण्यासाठी त्या प्रयत्नशील आहेत. पर्यावरण संरक्षणासाठी खत निर्मितीचे मशीन स्वतःच्या कॉम्प्लेक्समध्ये घेण्याबाबत पुढाकार घेऊन खत निर्मिती केली.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघात त्या महिला समन्वयक अशी जबाबदारी पार पाडत आहेत. याच स्वयंसेवक संघाकडून प्रसिद्धी निष्काम कर्मयोग या कार्यपद्धतीचे संस्कार झालेल्या अंजलीताईंना आपण करत असलेल्या कार्याची कुठेही वाच्यता न करता, प्रसिद्धी माध्यमांपासून दूर राहून सेवाभाव जपण्यासाठी त्या कायम प्रयत्नशील असतात. त्यांची ही मुलाखत देखील खूप विनंती केल्यानंतर त्यांनी दिली आहे. पुरस्कारांविषयी त्यांच्याशी चर्चा करताना सन्मानित पुरस्कारांसाठी त्यांचा बायोडेटा मागवलेला असताना त्यांनी विनम्रपणे दुसऱ्यांचे नाव सुचवून आणि स्वतःचे नाव त्या पुरस्कारांच्या यादीतून बाहेर काढले. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमध्ये अनेक महिला धडपडत असतात त्याच महिलांचा या पुरस्कारांवर खरा अधिकार असतो असं त्या प्रांजळपणे म्हणतात.

अल्पशिक्षित असूनही आदर्शवत जीवन जगणारे आई-वडील, अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे संस्थापक कै. यशवंतराव केळकर, घंटाळी मित्र मंडळाचे कै. गुरुवर्य अण्णा व्यवहारे, तिसरी म्हणजे कर्मसंन्यास दीक्षा देणारे बिहार योग विद्यालयाचे स्वामी निरंजनानंद सरस्वती, आजच्या जीवनातही चालते बोलते संत म्हणून डॉ. श्रीराम आगाशे यांसारखे गुरू जीवनात लाभणं यात मी स्वतःला भाग्यवान समजते. यातूनच त्यांचा गुरूप्रीत्यर्थ असणारा सविनय आदर समजतो. समाजकार्याचे हे संस्कार त्यांचा मुलगा कुणाल आणि मुलगी श्रुती या दोघांमध्ये आपसूकच रुजले आहेत स्वतःच्या पगारातील काही भाग समाजासाठी देत गांगल घरातील सेवाभावी वृत्तीने दान करण्याचा वारसा दोघांनीही जपला आहे.

कोणत्याही सामाजिक कार्याची सुरुवात ही स्वतःपासूनच केली पाहिजे असं अंजलीताई आवर्जून सांगतात. अहंकाराचा स्पर्श न होता आपल्याकडे उपलब्ध असलेला वेळ, शारीरिक शक्ती, वस्तू, कला, संपत्ती, ज्ञान हे सहजतेने ज्यांना हवे त्यांना उपलब्ध करून देणे म्हणजे समाजसेवा. आणि समाजसेवेचे फलित काय? तर रोज समाधानाने अत्यंत शांत झोप लागून जीवन आनंदी बनते. हाच त्यांच्या निरोगी जीवनाचा फंडा.

डॉ. अंजलीताई यांचे सामाजिक क्षेत्रातील योगदान हे समस्त महिलांसाठी प्रेरणा देणारे आहे. अशा सातत्याने नवनवीन माणसं जोडण्याची कला अवगत असणाऱ्या, संवादातून उत्तम समन्वय साधणाऱ्या, अत्यंत विनम्रतेने त्यांच्या उत्तम निरीक्षण शक्तीने इतरांतील गुण अचूक हेरणाऱ्या, समाजकार्यात कायम अग्रेसर असणाऱ्या या कर्मयोगीनीचे हे कार्य असेच अखंड अविरत चालू राहो व त्यांच्या या कार्याचा वटवृक्ष असाच दिवसागणिक बहरत राहो या सदिच्छेसह खूप शुभेच्छा.

Vaishu.gaikwad78@gmail.com

# मुद्रा-भाग २



मी योगिनी
डॉ. वैशाली दाबके

मागील भागात आपण सिंहमुद्रेविषयी जाणून घेतले. या भागात ब्रह्ममुद्रा या करायला सोप्या, पण अतिशय परिणामकारक अशा मुद्रेविषयी आपण जाणून घेणार आहोत.

**ब्रह्ममुद्रा -**

मस्तक आणि शरीराचा खांद्यांच्या खालचा भाग यांना जोडणारा अवयव म्हणजे मान आणि गळा. या भागात अन्ननलिका, श्वासनलिका, कानाकडून, मुखाकडून आणि नाकपुड्यांकडून येणारे मार्ग एकत्र येतात.



म्हणून या भागाला 'सप्तपथ' असे नाव आहे. याच भागात पडजीभ आणि टॉन्सिलसही असतात. मानेकडच्या मागच्या बाजूस मज्जारज्जू, मस्तकाकडून येणारे ज्ञानतंतू, रक्तदाब आणि हृदयाचे ठोके नियंत्रित करणाऱ्या नसा, स्वरयंत्र तसेच कंठग्रंथी म्हणजे थायरॉइड ग्लांड्स असे विविध महत्त्वाचे शरीराचे भाग आहेत. त्यामुळे या भागांचं आरोग्य जपणं अत्यंत महत्त्वाचं आहे. यासाठी मागील लेखात विस्तारानं सांगितलेली सिंहमुद्रा तसेच दत्तमुद्रा आणि ब्रह्ममुद्रा यांचा फार उपयोग होतो. ब्रह्मदेवाची मुखं ज्याप्रमाणे चार दिशांना असतात त्याप्रमाणे ब्रह्ममुद्रेच्या कृतीत चेहरा उजवीकडे, डावीकडे, वर आणि खाली अशा चार दिशांना वळवला जातो. म्हणून या मुद्रेला ब्रह्ममुद्रा असं म्हणतात.

**कृती -**

१. पद्मासन, वज्रासन किंवा सुखासनात म्हणजे साधी मांडी घालून बसावं. खाली बसता येत नसेल तर खुर्चीत बसून अथवा पायांत अंतर ठेऊन कमरेवर हात ठेऊन उभं राहूनही ही मुद्रा करता येते.

२. मान, खांदे, पाठकणा समस्थितीत ठेवावा.

३. चेहरा हळूहळू उजवीकडे न्यावा. हनुवटी खांद्याच्या पातळीला येईल इतकी न्यावी.

४. दृष्टी उजव्या बाजूस न्यावी किंवा डोळे अलगद मिटून घ्यावेत.

५. या स्थितीत दोन-तीन श्वास थांबून मान पुन्हा पूर्वस्थितीला म्हणजे मध्यभागी आणावी.

६. याच पद्धतीनं चेहरा डाव्या बाजूस न्यावा. दृष्टी या बाजूला वळवावी किंवा डोळे अलगद मिटून घ्यावेत. मान पुन्हा पूर्वस्थितीला आणावी.

७. यानंतर मान मागच्या बाजूला जितकी खाली जाईल तितकी जाऊ द्यावी. मात्र खांदे आणि कमरेतून मागे झुकू नये. खांदे, कंबर ताठच ठेवावी. या अंतिम स्थितीमध्ये जबडा एकमेकांवर मिटलेला असेल अशी काळजी घ्यावी जेणे करून गळ्यावर पूर्ण ताण येईल. पूर्वस्थितीला यावं.

८. यानंतर मान आणि गळा सैल करून मस्तक पुढच्या बाजूस झुकवावं आणि हनुवटी छातीला टेकवण्याचा प्रयत्न करावा. दृष्टी खालच्या बाजूस वळवून स्थिर करावी. मस्तक पुढं नेताना खांदे, छाती किंवा कमरेत झुकवू नये.

वरील चारही अवस्थांमध्ये तीन ते पाच श्वास थांबावं.

या चारही कृतींमध्ये मान आणि कंठ यावर आलटून पालटून दाब आणि ताण येतो. ही मुद्रा करतांना चित्त पूर्ण एकाग्र करून या दाब आणि ताणाचा अनुभव घेणं आवश्यक आहे.

या चारही कृती केल्यानंतर ब्रह्ममुद्रेचं एक आवर्तन पूर्ण होतं.

**लाभ :** १. मान आणि कंठ प्रदेशातील स्नायूंना ताण आणि संकोच होत असल्यामुळे हे दोन्ही अवयव लवचिक आणि दृढ होतात.

२. मेंदूकडून ज्ञानेंद्रियांकडे जाणारे ज्ञानतंतू कार्यक्षम होतात.

३. टॉन्सिल्सवरील सूज तसेच टॉन्सिल्सची अनावश्यक वाढ रोखण्यासाठी या मुद्रेचा उपयोग होतो.

४. थायरॉईड या अंतःस्त्रावी ग्रंथींचं कार्य योग्य रीतीनं होते.


५. रक्तदाब नियंत्रित ठेवण्यासाठी ही मुद्रा अतिशय लाभदायक आहे.

करायला सोपी असलेली ही मुद्रा म्हणजे आरोग्याच्या दृष्टीनं मोठं वरदान आहे. नित्य साधनेमध्ये या मुद्रेचा अंतर्भाव केलाच पाहिजे. **निषेध :** मानेचे गंभीर आजार असतील अथवा घशाला सूज असेल तर ही मुद्रा करणं टाळावं.

**दत्तमुद्रा -**

स्पॉंडिलायसिस सारखे मानेचे विकार असतील तर ब्रह्ममुद्रेऐवजी दत्तमुद्रा करावी.

ब्रह्ममुद्रेमधील पुढच्या बाजूला मान झुकवण्याची क्रिया वगळली तर दत्तमुद्रा होते. दत्तगुरूंच्या मूर्तीमध्ये



तीन दिशेला मुखं असतात. या मुद्रेमध्येही मान तीन दिशांना म्हणजे उजवीकडे, डावीकडे आणि वरच्या दिशेला वळवली जाते. म्हणून या मुद्रेला 'दत्तमुद्रा' म्हणतात. वर सांगितल्याप्रमाणे तीन दिशांना मान वळवल्यावर एक आवर्तन पूर्ण होतं. ब्रह्ममुद्रेचे लाभ दत्तमुद्रेनेही प्राप्त होतात.

**शारीर मुद्रा -**

आतापर्यंत आपण हस्तमुद्रा आणि मस्तक ते कंठापर्यंतच्या अवयवांशी संबंधित मुद्रा पाहिल्या. यानंतर शारीर अथवा कायिक म्हणजे प्रामुख्याने छाती, पोट या अवयवांशी संबंधित काही निवडक मुद्रा पाहणार आहोत. या मुद्रांमध्ये अंतिम स्थितीचं आसनांशी साम्य दिसतं परंतु आसनांपेक्षा मुद्रांचं वेगळेपण हे की मुद्रांमुळे अंतःस्त्रावी ग्रंथींच्या कार्याला प्रेरणा मिळते आणि त्या अधिकाधिक कार्यक्षम होतात. शारीरमुद्रांमध्ये योगमुद्रा, विपरीतकरणीमुद्रा, तडागीमुद्रा सामान्यतः केल्या जातात. या मुद्रांची माहिती पुढील लेखात पाहू.

# मटकी-भेळ टॉर्टिया बाईट्स



सुग्रास सुगरण
गायत्री डोंगरे

मराठी घरात भेळ म्हणजेच चवदार, तिखट-गोडसर आणि थोडा आंबट असा चवींचा धमाका. त्यात जर मटकीसारखा पौष्टिक आणि पारंपरिक घटक घालायचा तर रेसिपी केवळ स्वादिष्टच नाही तर आरोग्यदायीही होते.

टॉर्टिया चिप्सचा कुरकुरीतपणा आणि दही-साखर-शेवच्या सौम्यतेने याला एक ग्लोबल टच मिळतो, ज्यामुळे पारंपरिक भेळ अधिक आकर्षक आणि सगळ्यांसाठी सहज खाण्यायोग्य होते. ही रेसिपी पाहुण्यांना दिल्यास, तुम्हाला सोपी, पौष्टिक आणि डिश खाऊ घातल्याचा आनंद नक्कीच मिळेल.

**साहित्य :**

- मोड आलेली मटकी १ कप
- तुकडे केलेला कांदा १ मध्यम
- बारीक चिरलेला टोमॅटो १ मध्यम
- कोथिंबीर (चिरलेली) २ टेबलस्पून
- चिंच-गूळ चटणी (मिठ्ठी-आंबट मिश्रण ३-४ टेबलस्पून
- दही (फेटलेले) १/२ कप
- टॉर्टिया चिप्स / पापडी १ मोठा वाटी
- शेव १/४ कप
- मीठ आणि मिरची पूड चवीनुसार



**कृती :** मोड आलेली मटकी स्वच्छ धुवून उकळत्या पाण्यात १५-२० मिनिटं शिजवा. (मऊसर होईपर्यंत).

एका मोठ्या वाडग्यात उकडलेली मटकी, कांदा, टोमॅटो, कोथिंबीर घाला. त्यात मीठ, मिरची पूड आणि चिंच-गूळ चटणी मिसळा.

फेटलेले दही हळूवारपणे भेळ मिश्रणात घाला आणि नीट मिक्स करा. दही मिक्स केल्याने चव सौम्य आणि थोडीशी थंडसर होते.

सर्व्हिंग प्लेटमध्ये टॉर्टिया चिप्स (किंवा पापडी) थोडीशी ठेवून त्यावर तयार भेळ चा एक चमचा थोडक्यात ठेवा.



**सजावट :**

- भेळवर शेव घाला. शेवमुळे कुरकुरीतपणा येतो पदार्थ सुंदर दिसतो.
- टॉर्टिया bites पटकन सर्व्ह करा, अन्यथा चिप्स मऊ पडू शकतात.
- पौष्टिकता आणि फायदेः
- मटकीः प्रथिने आणि फायबरने समृद्ध, पचनासाठी मदत करणारी.
- चिंच-गूळ चटणीः नैसर्गिक स्वीटनर व आंबटसर चव देणारी, जी पचन सुधारते.
- दहीः प्रोबायोटिक्सचा उत्तम स्रोत, पचनाला सुधारणा.
- टॉर्टिया चिप्सः कमी तेल वापरून किंवा घरच्या बनवलेल्या वापरल्यास अधिक पौष्टिक.

**टिप्स :** घरगुती टॉर्टिया चिप्स करायचे असल्यास, गहू किंवा मक्याच्या तांदळाच्या पिठापासून तयार करावे.

# दौनापूरची ग्रामपंचायत म्हणते डॉ.आंबेडकरांची कमान नको!

**उपोषण** | **जिल्ह्यातील अनेक नेत्यांचा जाहीर पाठींबा**

पुण्यभूमी प्रतिनिधी



बीड:भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार व बहुजन समाजाचे उद्धारक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने कमान उभारण्यासाठी परवानगी द्यावी या मागणीसाठी आज दिनांक २० मे पासून बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बौद्ध समाजाच्या वतीने महिला,लेकरा बाळासह उपोषण सुरू करण्यात आले होते.या उपोषणाचा आज तिसरा दिवस असून बीड जिल्ह्यातील बहुजन समाजाच्या अनेक नेत्यांनी उपोषणाला भेट देऊन आपला पाठींबा दिला. व कमानीला परवानगी न दिल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा या नेत्यांनी दिला आहे.

याबाबत परळी तालुक्यातील दौनापूर येथील बौद्ध समाजाने बीड जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले होते .या निवेदनात म्हंटले होते की,दिनांक ५ एप्रिल २०२५ रोजी दौनापूर येथील बौद्ध समाजाच्या वतीने ग्रामपंचायतीला बौद्ध वस्ती समोरील रस्त्यावर प्रवेशद्वार अर्थातच कमान उभारण्याची परवानगी मागण्यासाठी अर्ज केला. त्यावर ग्रामपंचायतीने परवानगी तर दिलीच नाही उलट सरपंच राजेभाऊ प्रभाकर आघाव यांनी ग्रामपंचायतीचा ठराव घेतला.व ठरावा द्वारे कमानीला परवानगी देण्यात येणार नाही असे सांगितले होते.त्यानंतर दौनापूर येथील बौद्ध समाजाने भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रवेशद्वार,( कमान) करण्याची परवानगी द्यावी अन्यथा २० मे २०२५ पासून बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषणाचा इशारा दिला होता. आज उपोषणाचा दुसरा दिवस आहे.मिलिंद घाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली चाललेल्या आमरण उपोषणास बहुजन विकास मोर्चाचे संस्थापक अध्यक्ष बाबुरावजी पोटभरे , राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते दयानंद भाऊ स्वामी, वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे आंबेडकर चळवळीचे जेष्ठ नेते बबनराव वडमारे, वंचित बहुजन आघाडी जिल्हा नेते धम्मानंद साळवे,वंचित बहुजन आघाडीच्या महिला नेत्या पुष्पाताई तुरुकमारे, बहुजन समाज पार्टीचे जिल्हाध्यक्ष प्रशांतजी वासनिक, ऑल इंडिया पँथर सेनेचे जिल्हाध्यक्ष नितीन सोनवणे, वंचित बहुजन आघाडीचे महासचिव ज्ञानेश्वर कवठेकर वंचित बीड जिल्हा नेते पुरुषोत्तम वीर, ज्येष्ठ नेते अर्जुन उजगरे, संभाजी ब्रिगेडचे नेते सेवकराम जाधव, जिल्हा प्रतिनिधी पान २ वर

## श्रमदानातून राबणार स्वछता मोहिम

धोरण:सीईओ आदित्य जीवने यांची माहिती

पुण्यभूमी प्रतिनिधी



बीड:केंद्र व राज्य शासनाच्या वतीने पर्यावरण व स्वच्छतेच्या अनुषंगाने विविध उपक्रम राबविण्याबाबत सूचना दिल्या आहेत. त्यानुसार स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत जिल्ह्यात गावपातळीवर विविध उपक्रमांची अंमलबजावणी करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक आदित्य जीवने यांनी दिली आहे.

~~जिल्ह्यात सर्व ग्रामपंचायत मध्ये~~ दिनांक २२ मे ते ५ जून २०२५ या कालावधीत प्लास्टिक प्रदूषण निर्मूलन मोहीम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेंतर्गत गावातील सार्वजनिक ठिकाणी श्रमदानातून स्वच्छता मोहीम राबवली जाणार आहे. तसेच प्लास्टिक संकलन, एकल वापराच्या प्लास्टिकचा वापरावर बंदी करणे तसेच कचऱ्याचे वर्गीकरण करून वर्गीकरण केंद्रात साठवणे याविषयी जनजागृती केली जाणार आहे. टाकाऊपासून टिकाऊ या संकल्पनेनुसार प्लास्टिक कचऱ्यापासून उपयोगी वस्तू तयार करण्याचे उपक्रमही राबवले जातील. गावात सोशल मीडियाच्या माध्यमातून पर्यावरण व स्वच्छतेबाबत जनजागृती केली जाणार आहे. या मोहिमेचा प्रारंभ श्रमदान आयोजित करून करावा असे आवाहन मुख्य मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केले आहे. यामध्ये श्रमदानात उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा, तसेच कचरा वर्गीकरण करावे असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केले आहे. दिनांक २८ मे रोजी मासिक पाळी व्यवस्थापन दिन साजरा करण्यात येणार आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे, शाळा व अंगणवाड्यांमार्फत किशोरवयीन मुली व महिलांना मासिक पाळी व्यवस्थापन, स्वच्छता व सॅनिटरी नॅपकिन्सच्या वापराबाबत माहिती देण्यात येईल. यासाठी आरोग्य कर्मचारी, महिला बचत गट, महिला पान २ वर

## निवडणुकीसाठी कामाला लागावे

राजेंद्र मस्के:आष्टी येथे तालुका स्तरीय बैठक



पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:काही दिवसांवर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आल्या असून या अनुषंगाने राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची आष्टी येथे तालुका स्तरीय बैठक बोलवण्यात आली होती. जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के व प्रदेश युवक अध्यक्ष महेबूब शेख यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक संपन्न झाली. बैठकीस जिप सदस्य सतीश शिंदे, प्रदेश सचिव ड.नरसिंह जाधव, अण्णासाहेब चौधरी, सुनील नाथ, तालुका अध्यक्ष परमेश्वर शेळके,संजय थोरवे,राम खाडे, मिसाळ पाटील, मिर्झा बेग,तांबेताई यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी बहुसंख्येने गर्दी केली होती.

बैठकीस संबोधित करताना राजेंद्र मस्के म्हणाले की,लोकसभा व विधानसभा निवडणुका पार पडल्या, आता जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपरिषद निवडणुका म्हणजे कार्यकर्त्यांच्या निवडणुका होणार आहेत.या निवडणुकांमध्ये निष्ठावंत कार्यकर्त्यांना संधी दिली जाणार आहे. आष्टी मतदार संघातील लोक व कार्यकर्ते शरद पवार साहेबांना मानणारा आहे. आष्टी मतदार संघात सत्ता असो अथवा नसो पक्षाशी एकनिष्ठ असणाऱ्या कार्यकर्त्यांची मोठी फळी आहे. या कार्यकर्त्यांच्या जीवावर पक्ष उभा राहिला. निष्ठेने काम करून कार्यकर्त्यांनी निवडणुकीत विजय मिळवून दिला. परंतु विजय झाल्यानंतर अथवा सत्तेत गेल्यानंतर कार्यकर्त्यांचा विचार आमदारांनी केला नाही अशी खंत ही काही कार्यकर्त्यांनी या बैठकीदरम्यान व्यक्त केली. आगामी काळातील निवडणुकांत विजय होण्यासाठी कार्यकर्त्यांनी कामाला लागावे असे आवाहन जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी केले. विधानसभा निवडणुकीत जे काही झाले ते सर्व मी विसरून गेलो आहे. सामान्य कुटुंबातील एक कार्यकर्ता म्हणून मी काम करतो. पक्ष मजबुत करून पक्षाला विजय प्राप्त करून देण्यासाठी माझी धडपड आहे. शरद पवार साहेब यांच्या नेतृत्वात आपला पक्ष कायम जनमानसात अग्रेसर आहे. निष्ठावान व मेहनत करणाऱ्या कार्यकर्त्याला न्याय देण्यासाठी ही आजची आढावा बैठक आहे. पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी कार्यकर्त्यांनी नेतृत्वाच्या मार्गदर्शना खाली काम करावं. असा सल्ला महेबूब शेख यांनी उपस्थित कार्यकर्त्यांना दिला.

## नगरचे नवे एसपी सोमनाथ घार्गे

धोरण:शिस्तप्रिय डॅशिंग,कर्तव्यदक्ष म्हणून ओळख

पुण्यभूमी प्रतिनिधी



नगर:अहिल्यानगरच्या नवीन जिल्हा पोलीस अधीक्षक म्हणून सोमनाथ घार्गे यांची नियुक्ती करण्यात आली असून अतिशय शिस्तबद्ध डॅशिंग कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून त्यांची ख्याती आहे. या अगोदर ही त्यांनी जिल्हातील श्रीरामपूर येथे उपविभागीय अधिकारी म्हणून सेवा दिली आहे गुन्हेगारीचे कर्दनकाळ म्हणुन त्यांची ओळख निर्माण केली होती राज्यभर गाजलेले श्रीरामपूर येथील अरुणा बर्डे हत्याकांड आणि देवळाली येथील बबलु पंडित हत्याकांडाचा यशस्वी तपास त्यांचा मार्गदर्शनाखाली लावण्यात आला होता.

पोलीस दलात पोलीस आयुक्त म्हणूनही यशस्वी जबाबदारी त्यांनी पार पाडली आहे रायगड व संभाजीनगर पोलीस अधीक्षक म्हणून कार्यरत असताना त्यांनी कायदा व सुव्यवस्था राखत अनेक गुन्ह्याची उकल करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे अहिल्यानगर जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक जबाबदारी स्वीकारताना जिल्हात अवैध धंदे व गुन्हेगारी अवैध व्यवसायाचे आवाहन त्यांचा समोर असणार आहे

## बीडमध्ये दोन बालविवाह रोखले

चिंतन: पालकांनो मुलांचे बालविवाह करू नका

पुण्यभूमी प्रतिनिधी



बीड:पोलीस स्टेशन बीड ग्रामीण हद्दीत पांगरबावडी या गावी सखाराम मोगलाजी संकोड, व गंगाराम गंगाधर अनारसे यांचे घरी एकत्र दोन बालविवाह होत असल्याचे गोपनीय माहिती अवैध मानवी वाहतूक पथकास मिळाली होती,त्या नुसार पथकाने सदर ठिकाणी सामाजिक कार्यकर्ते व पांगर बावडी गावाचे बालविवाह अधिकारी यांनी भेट दिली असता लग्नातील दोन्ही नवरी मुली अल्पवयीन मिळून आल्या, शिक्षणाचा अभाव, भटके जीवन, तसेच कायद्याबद्दलचे अज्ञान, तरुण मुलींना वयात आल्यानंतर सांभाळायचे कसे ?अशी अनेक कारणांमुळे मुलीचा विवाह लावत असल्याचे पालकांनी सांगितले, दोन्ही कडील आई वडील नातेवाईक, यांना अवैध मानवी वाहतूक पथकाने कमी वयातील लग्नामुळे मुलींच्या शरीरावर होणारे गंभीर परिणाम, लहान वयात पडणाऱ्या जबाबदाऱ्या, कुपोषित अपत्य, शिक्षणाचे महत्त्व अशा सर्व समुपदेशन करून मुलीचा विवाह अठरा वर्षे झाल्याशिवाय लावून देणार नाही, असे हमीपत्र घेवून सदरचे दोन्ही बालविवाह रोखण्यात आले, ही कारवाई पोलीस पान २ वर

## सीईओ आशिष येरेकर अमरावतीचे कलेक्टर!

कारकीर्द:नगर जिल्ह्य परिषदेत उल्लेखनीय कामगिरी

पुण्यभूमी प्रतिनिधी



नगर:जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर यांची पदोन्नतीसह अमरावती जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी पदी नियुक्ती करण्यात आली आहे नगर जिल्हा परिषदेत त्यांनी उल्लेखनीय अशी कामगिरी केली आहे

राज्य शासनाने बुधवारी आठ आयएएस अधिकाऱ्यांच्या बदलीचे आदेश जारी केले यामध्ये आशिष येरेकर यांच्या बदलीचा समावेश आहे आशिष येरेकर यांनी गेले तीन वर्षात नगर जिल्हा परिषदेत प्रशासक महत्त्वपूर्ण व उल्लेखनीय कामगिरी केली असून त्यांच्या कार्यकाळात अनेक नावीन्यपूर्ण उपक्रम राबवले गेले असुन नगर जिल्ह्य परिषदेला पंचायत राजचे अनेक पुरस्कार मिळाले आहेत

मिशन आपुलकी अंतर्गत प्राथमिक शाळांमध्ये भौतिक सुविधांमध्ये वाढ मिशन आरंभ मधुन शिष्यवृत्ती आणि नवोदय परीक्षांमध्ये विद्यार्थ्यांची सुधारलेली गुणवत्ता तसेच कर्मचाऱ्यांच्या हजेरी साठी क्यूआर कोड प्रणाली या सारखें पान २ वर

## अल्पवयीन मुलीचे अपहरण

कारवाई:परळी पोलिसांत गुन्हा दाखल

पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी:तालुक्यातील पांगरी ता. परळी वै येथे राहणाऱ्या एका मजुराच्या १५ वर्षीय मुलीचे अपहरण झाल्याप्रकरणी परळी वैजनाथ ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलीस सूत्रांकडून प्राप्त अधिक माहितीनुसार, कैलास वैजनाथ आरगडे रा. ताडपांगरी ता. जि. परभणी ह.मु. पांगरी ता. परळी वै. येथे मजूर म्हणून काम करतात. त्यांची १५ वर्षीय मुलगी बेपत्ता झाली आहे. तीस कोणीतरी अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणासाठी पळवुन घेऊन गेला आहे अशा प्रकारची फिर्याद देण्यात आली. या फिर्यादीवरून ग्रामीण पोलीस ठाण्यात गुरन- २१९/२०२५ कलम १३७ (२),बीएनएस प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पुढील तपास सपोनि जाधव हे करीत आहेत.

## रेशन कार्ड धारकांची ई केवायसी

हेमंत ढोकले:प्रशासनाकडून आवाहन

पुण्यभूमी प्रतिनिधी



कळंब:तालुक्यातील सर्व शासनमान्य रास्त भाव धान्य दुकानदारांनी सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील सर्व पात्र लाभार्थ्यांनी राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजने अंतर्गत अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंब लाभार्थी योजना व प्राधान्य कुटुंब लाभार्थी योजना अंतर्गत शिधापत्रिकाधारकांना शासकीय अनुदानित अन्नधान्याचा लाभ सुरू ठेवण्यासाठी कुटुंबातील रेशन कार्डा मध्ये नोंदणी असलेल्या सर्व सदस्याचे ई केवायसी ३० मे २०२५ पर्यंत पूर्ण करणे सरकारने बंधनकारक केले आहे ज्या सदस्याचे ई केवायसी पूर्ण होणार नाही त्यांचा अन्नधान्याचा लाभ बंद होणार आहे तरी तालुक्यातील सर्व रेशन कार्डधारकानी आपल्या कुटुंबातील रेशन कार्डात नाव असलेल्या सर्व सदस्यांचे ई केवायसी पुर्ण करून घ्यावी व ई केवायसी पूर्ण करण्यासाठी संबंधित लाभार्थी यांनी कोणत्याही रास्त भाव दुकानात जाऊन आधार कार्ड घेऊन समक्ष उपस्थित पान २ वर

**डॉ.योगेश क्षीरसागर** | **राष्ट्रवादी शिष्टमंडळाचे सीओंचे निवेदन**

## नागरी समस्या तातडीने सोडवा

पुण्यभूमी प्रतिनिधी



बीड:शहरातील नागरी समस्या दिवसेंदिवस गंभीर होत असून, त्यावर तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार गट) शिष्टमंडळाने नगरपरिषद मुख्याधिकारी नीता अंधारे यांच्याकडे गुरुवारी (दि.२२) केली. पक्षाचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखालील या शिष्टमंडळात माजी नगरसेवकांचा समावेश होता. विविध विभागांतील समस्यांवर ठोस कृती आराखडा राबवावा, असेही निवेदनात म्हटले आहे.निवेदनात पुढे म्हटले आहे की, शहरातील मान्सूनपूर्व स्वच्छता, नालेसफाई, पथदिवे, रस्त्यांची दुरवस्था, पाणी पुरवठ्याची विस्कळीत व्यवस्था, अपूर्ण गाळे व बाजारपेठांची कामे, तसेच आरोग्य सुविधा आणि कर वसुलीतील अडचणी आदी मुद्द्यांवर शिष्टमंडळाने मुख्याधिकाऱ्यांना धारेवर धरले. सध्या शहरातील अनेक मुख्य नाले कचऱ्यामुळे तुंबले असून, त्यामुळे डास, दुर्गंधी व आरोग्याच्या समस्या वाढल्या आहेत. हे नाले तातडीने यंत्राच्या सहाय्याने साफ करण्यात यावेत. तसेच, नव्या घंटागाड्या, जेसीबी व कम्पॅक्टर खरेदी करून स्वच्छतेसाठी पायाभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी करण्यात आली.

शहरातील अनेक भागांमध्ये पथदिवे बंद अवस्थेत आहेत तर काही भागांत दिवसा दिवे सुरू असतात. हायमास्ट दिव्यांचीही अवस्था दयनिय असून, त्यांची त्वरित दुरुस्ती आवश्यक आहे. सौर ऊर्जेचा वापर वाढवून मिनी हायमास्ट दिवे, स्मशानभूमीत प्रकाशयोजना व नगरपरिषद इमारतीवर सौर प्रकल्प बसविण्याचेही सुचविण्यात आले.पाणी पुरवठा विभागातील कंत्राटी कर्मचाऱ्यांचे वेतन वेळेवर व्हावे, माजलगाव व बिंदुसरा प्रकल्पाच्या मदतीने नव्या पाणी योजनांचा प्रस्ताव तयार करून शासनाला सादर करावा, अशा सूचना शिष्टमंडळाने केल्या. श्रीरामनगर येथील जुन्या पाण्याच्या टाकीऐवजी नवीन टाकी उभारण्याची, तसेच अनधिकृत नळजोडण्या नियमित करून कराच्या कक्षेत आणण्याची मागणी करण्यात आली.बांधकाम विभागाच्या कामांबाबतही विविध सूचना देण्यात आल्या. यशवंत नाट्यगृह, आंबेडकर सांस्कृतिक भवन यांची दुरुस्ती करावी, प्रमुख चौकांचे सुशोभीकरण करावे, नव्या भाजी मंडई व गाळ्यांचे बांधकाम पूर्ण करून सुरू करावे, तसेच रस्त्यांवरील खड्डे, सिमेंट रोडच्या सांधेबांध तातडीने कराव्यात. बेघर महिला निवारा गृह व नव्या स्मशानभूमीची उभारणी गरजेची असल्याचे सांगण्यात आले. आरोग्य विभागातील प्राथमिक आरोग्य केंद्रे अपुरी पडत असल्याने नव्या केंद्रांचा प्रस्ताव शासनाकडे पाठवावा, अशी सूचना करताना पेठ बीड, शाहूनगर भागांसाठी पान २ वर

## खबरदार ड्रोन उडविणे महागात पडेल

सूचना: ड्रोन कॅमेरा, मानवविरहीत यंत्र उडविण्यास मनाई



पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:भारतीय सैन्याकडून पहलगाव येथील दहशतवादी हल्लयाचे नंतर ऑपरेशन सिंदुर राबवुन पाकिस्तान मधील दहशतवाद्यांची ठिकाणे नष्ट करण्यात आलेली आहेत. यामुळे स्लीपर सेल सक्रिय होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे नागरिकांचे सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून ड्रोन कॅमेरा, मानवविरहित यंत्र चालविण्यास, उडविण्यास मनाई करणेबाबत दिनांक १४ मे ते ३ जून २०२५ पर्यंत भारतीय नागरी सुरक्षा संहिता कलम १६३ लागू करणे बाबत राज्य गुप्तवार्ता विभाग मुंबई यांनी कळविले आहे.

सदर घटनेचे गांभीर्य लक्षात घेता नागरिकांचे सुरक्षिततेच्या पान २ वर